| १४६.<br><br>146. | पवार, श्री. रोहित (कर्जत जामखेड)<br><br>Pawar, Shri Rohit (Karjat Jamkhed) | २ | ४ | ३३% |
| १४७.<br><br>147. | पाचपुते, श्री. विक्रम बबनराव (श्रीगोंदा)<br><br>Pachpute, Shri Vikram Babanrao (Shrigonda) | ५ | १ | ८३% |
| १४८.<br><br>148. | पाटील, श्री. अनिल भाईदास (अमळनेर)<br><br>Patil, Shri Anil Bhaidas (Amalner) | ६ | - | १००% |
| १४९.<br><br>149. | पाटील, श्री. अभिजीत धनंजय (माढा)<br><br>Patil, Shri Abhijeet Dhananjay (Madha) | ५ | १ | ८३% |
| १५०.<br><br>150. | पाटील, श्री. अमोल चिमणराव (एरंडोल)<br><br>Patil, Shri Amol Chimanrao (Erandol) | ६ | - | १००% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १५१.<br><br>151. | पाटील, श्री. अशोक धर्मराज ( भांडुप पश्चिम )<br><br>Patil, Shri Ashok Dharmaraj (Bhandup West) | ५ | १ | ८३% |
| १५२.<br><br>152. | पाटील, श्री. किशोर आप्पा (पाचोरा)<br><br>Patil, Shri Kishor Appa (Pachora) | - | ६ | - |
| १५३.<br><br>153. | पाटील, श्री. गुलाबराव रघुनाथ (जळगाव ग्रामीण)<br><br>Patil, Shri Gulabrao Raghunath (Jalgaon Rural) | **मा. मंत्री** | | |
| १५४.<br><br>154. | पाटील, श्री. चंद्रकांत निंबा (मुक्ताईनगर)<br><br>Patil, Shri Chandrakant Nimba (Muktainagar) | १ | ५ | १६% |
| १५५.<br><br>155. | पाटील, श्री. चंद्रकांत (दादा) बच्चु (कोथरुड)<br><br>Patil, Shri Chandrakant (Dada) Bachhu (Kothrud) | **मा. मंत्री** | | |
| १५६.<br><br>156. | पाटील, श्री. जयंत राजाराम (इस्लामपूर)<br><br>Patil, Shri Jayant Rajaram (Islampur) | ४ | २ | ६६% |
| १५७.<br><br>157. | पाटील, श्री.नारायण ( आबा ) गोविंदराव (करमाळा)<br><br>Patil, Shri Narayan (Aba) Govindrao (Karmala) | ५ | १ | ८३% |
| १५८.<br><br>158. | पाटील चिखलीकर, श्री. प्रतापराव गोविंदराव (लोहा)<br><br>Patil Chikhalikar, Shri Prataprao Govindrao (Loha) | ५ | १ | ८३% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १५९.<br><br>159. | पाटील, श्री. बाबासाहेब मोहनराव (अहमदपुर)<br><br>Patil, Shri Babasaheb Mohanrao Patil, (Ahmadpur) | **मा. मंत्री** | | |
| १६०.<br><br>160. | पाटील, श्री. रविशेठ (पेण)<br><br>Patil, Shri Ravisheth (Pen) | ५ | १ | ८३% |
| १६१.<br><br>161. | पाटील, श्री. राघवेंद्र (रामदादा) मनोहर (धुळे ग्रामीण)<br><br>Patil, Shri Raghavendra (Ramdada) Manohar (Dhule Rural) | ६ | - | १००% |
| १६२.<br><br>162. | पाटील (यड्रावकर), श्री. राजेंद्र शामगोंडा (शिरोळ)<br><br>Patil(Yadravkar), Shri Rajendra Shamgonda (Shirol) | १ | ५ | १६% |
| १६३.<br><br>163. | पाटील, श्री. राणाजगजितसिंग पद्मसिंह (तुळजापुर)<br><br>Patil, Shri Ranajagjitsinha Padma-sinha (Tuljapur) | ४ | २ | ६६% |
| १६४.<br><br>164. | पाटील, डॉ. राहुल वेदप्रकाश (परभणी)<br><br>Patil, Dr. Rahul Vedprakash (Parbhani) | ५ | १ | ८३% |
| १६५.<br><br>165. | पाटील, श्री. रोहित सुमन आर.आर. आबा (तासगाव-कवठे महांकाळ)<br><br>Patil, Shri Rohit Suman R.R. Aba (Tasgaon-Kavathe Mahankal) | ६ | - | १००% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १६६.<br><br>166. | पाटील, श्री. सचिन (फलटण)<br><br>Patil, Shri Sachin (Phaltan) | ५ | १ | ८३% |
| १६७.<br><br>167. | पाटील, श्री. शिवाजी शट्टप्पाप (चंदगड)<br><br>Patil, Shri Shivaji Shattupa (Chandgad) | ६ | - | १००% |
| १६८.<br><br>168. | पाडवी, श्री. आमश्या फुलजी (अक्कलकुवा)<br><br>Padvi Amshya Fulji (Akkalkuwa) | ५ | १ | ८३% |
| १६९.<br><br>169. | पाडवी, श्री. राजेश उदेसिंग (शहादा)<br><br>Padvi, Shri Rajesh Udesing (Shahada) | ६ | - | १००% |
| १७०.<br><br>170. | पावरा, श्री. काशिराम वेचान (शिरपूर)<br><br>Pawara, Shri Kashiram Vechan (Shirpur) | ५ | १ | ८३% |
| १७१.<br><br>171. | पुराम, श्री. संजय (आमगाव)<br><br>Puram, Shri Sanjay (Amgaon) | ६ | - | १००% |
| १७२.<br><br>172. | पोतनीस, श्री. संजय गोविंद (कलिना)<br><br>Potnis, Shri Sanjay Govind (Kalina) | ५ | १ | ८३% |
| १७३.<br><br>173. | पंडित, श्री. विजयसिंह शिवाजीराव (गेवराई)<br><br>Pandit, Shri Vijaysinh Shivajirao (Georai) | ६ | - | १००% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १७४.<br>174. | पिंपळे, श्री. हरीश मारोतीअप्पा (मुर्तीजापूर)<br>Pimple, Shri Harish Marotiappa (Murtizapur) | ५ | १ | ८३% |
| १७५.<br>175. | प्रभू, श्री. सुनिल वामन (दिंडोशी)<br>Prabhu, Sunil Waman (Dindoshi) | ६ | - | १००% |
| १७६.<br>176. | फडणवीस, श्री. देवेंद्र गंगाधरराव (नागपूर दक्षिण पश्चिम)<br>Fadnavis, Shri Devendra Gangad-harao (Nagpur South West) | **मा. मुख्यमंत्री** | | |
| १७७.<br>177. | फरांदे, श्रीमती देवयानी सुहास (नाशिक मध्य)<br>Pharande Smt Devyani Suhas (Nashik Central) | ३ | ३ | ५०% |
| १७८.<br>178. | फुंडकर, श्री. आकाश पांडुरंग (खामगाव)<br>Fundkar, Shri Akash Pandurang (Khamgaon) | **मा. मंत्री** | | |
| १७९.<br>179. | बकाने, श्री. राजेश भाऊराव (देवळी)<br>Bakane, Shri Rajesh Bhaurao (Deoli) | ५ | १ | ८३% |
| १८०.<br>180. | बडोले, श्री. राजकुमार सुदाम (अर्जुनी-मोरगाव)<br>Badole, Shri Rajkumar Sudam (Arjuni Morgaon) | ५ | १ | ८३% |
| १८१.<br>181. | बनकर, श्री. दिलीपराव शंकरराव (निफाड)<br>Bankar, Shri Diliprao Shankarrao (Niphad) | ५ | १ | ८३% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १८२.<br><br>182. | बनसोडे, श्री. अण्णा दादू (पिंपरी)<br><br>Bansode, Shri Anna Dadu (Pimpri) | १ | ५ | १६% |
| १८३.<br><br>183. | बनसोडे, श्री. संजय बाबुराव (उदगीर)<br><br>Bansode, Shri Sanjay Baburao (Udgir) | ५ | १ | ८३% |
| १८४.<br><br>184. | बाबर, श्री. सुहास अनिलभाऊ (खानापूर)<br><br>Babar Shri Suhas Anilbhau (Khanapur) | ६ | - | १००% |
| १८५.<br><br>185. | बालदी, श्री. महेश (उरण)<br><br>Baldi, Shri Mahesh (Uran) | ४ | २ | ६६% |
| १८६.<br><br>186. | बावनकुळे, श्री. चंद्रशेखर कृष्णराव (कामठी)<br><br>Bawankule, Shri Chandrashekhar Krushnarao (Kamthi) | **मा. मंत्री** | | |
| १८७.<br><br>187. | बोरनारे, श्री. रमेश नानासाहेब (वैजापुर)<br><br>Bornare, Shri Ramesh (Vaijapur) | ६ | - | १००% |
| १८८.<br><br>188. | बोरसे, श्री. दिलीप मंगळू (बागलाण)<br><br>Borse, Shri Dilip Manglu (Baglan) | ५ | १ | ८३% |
| १८९.<br><br>189. | बंब, श्री. प्रशांत बन्सीलाल (गंगापूर)<br><br>Bumb Shri Prashant Bansilal (Gangapur) | ३ | ३ | ५०% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १९०.<br><br>190. | बांगर, श्री. संतोष लक्ष्मणराव (कळमनुरी)<br><br>Bangar Shri Santosh Laxmanrao (Kalamnuri) | ६ | - | १००% |
| १९१.<br><br>191. | भरणे, श्री. दत्तात्रय विठोबा (इंदापूर)<br><br>Bharane, Shri Dattatraya Vithoba (Indapur) | **मा. मंत्री** | | |
| १९२.<br><br>192. | भातखळकर, श्री. अतुल (कांदिवली पूर्व)<br><br>Bhatkhalkar, Shri Atul (Kandivali East) | ६ | - | १००% |
| १९३.<br><br>193. | भारसाकळे, श्री. प्रकाश गुणवंतराव (आकोट)<br><br>Bharasakale, Shri Prakash Gunawantrao (Akot) | ६ | - | १००% |
| १९४.<br><br>194. | भुजबळ, श्री. छगन (येवला)<br><br>Bhujbal, Shri Chhagan (Yevla) | १ | ५ | १६% |
| १९५.<br><br>195. | भुमरे, श्री. विलास संदिपानराव (पैठण)<br><br>Bhumre, Shri Vilas Sandipanrao (Paithan) | - | ६ | - |
| १९६.<br><br>196. | भुसे, श्री. दादाजी दगडू (मालेगाव बाह्य)<br><br>Bhuse, Shri Dadaji Dagdu (Malegaon Outer) | **मा. मंत्री** | | |
| १९७.<br><br>197. | भोईर, श्री. विश्वनाथ आत्माराम (कल्याण पश्चिम)<br><br>Bhoir, Shri Vishwanath Atmaram (Kalyan West) | -- | ६ | -- |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १९८.<br>198. | भोयर, डॉ. पंकज राजेश (वर्धा)<br>Bhoyar, Dr. Pankaj Rajesh (Wardha) | **मा. राज्यमंत्री** | | |
| १९९.<br>199. | भोये, श्री. हरिशचंद्र सखाराम (विक्रमगड)<br>Bhoye, Shri Harishchandra Sakha-ram (Vikramagad) | ६ | - | १००% |
| २००.<br>200. | भोसले, डॉ. अतुलबाबा सुरेश (कराड दक्षिण)<br>Bhosale, Dr. Atulbaba Suresh (Karad South) | ६ | - | १००% |
| २०१.<br>201. | भोसले, श्री. शिवेंद्रराजे अभयसिंहराजे (सातारा)<br>Bhosale, Shri Shivendraraje Abhaysinhraje (Satara) | **मा. मंत्री** | | |
| २०२.<br>202. | भोळे, श्री. सुरेश (राजू मामा) दामु (जळगाव शहर)<br>Bhole, Shri Suresh (Raju Mama) Damu (Jalgaon city) | ६ | - | १००% |
| २०३.<br>203. | भांगडिया, श्री. बंटी मितेश (चिमूर)<br>Bhangadia, Shri Bunty Mitesh (Chimur) | ६ | - | १००% |
| २०४.<br>204. | भोंगळे, श्री. देवराव विठोबा (राजुरा)<br>Bhongale, Shri Devrao Vithoba (Rajura) | ६ | - | १००% |
| २०५.<br>205. | भोंडेकर, श्री. नरेंद्र भोजराज (भंडारा)<br>Bhondekar, Shri Narendra Bhojraj (Bhandara) | ४ | २ | ६६% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २०६.<br><br>206. | मते, श्री. मोहन गोपाळराव (नागपूर दक्षिण)<br><br>Mate, Shri Mohan Gopalrao (Nagpur South) | ५ | १ | ८३% |
| २०७.<br><br>207. | मलिक, सना (अणुशक्ती नगर)<br><br>Malik, Sana (Anu Shakti Nagar) | ६ | - | १००% |
| २०८.<br><br>208. | मसराम, श्री. रामदास मळूजी (आरमोरी)<br><br>Masram, Shri Ramdas Maluji (Armori) | ६ | - | १००% |
| २०९.<br><br>209. | महाजन, श्री. गिरीश दत्तात्रय (जामनेर)<br><br>Mahajan, Shri Girish Dattatraya (Jamner) | **मा. मंत्री** | | |
| २१०.<br><br>210. | महाडीक, श्री. अमल महादेवराव (कोल्हापूर दक्षिण)<br><br>Mahadik, Shri Amal Mahadevarao (Kolhapur South) | ६ | - | १००% |
| २११.<br><br>211. | महाले, श्रीमती श्वेता विद्याधर (चिखली)<br><br>Mahale, Smt. Shweta Vidyadhar (Chikhli) | ४ | २ | ६६% |
| २१२.<br><br>212. | माने, दलितमित्र डॉ. अशोकराव (बापू) (हातकंणगले)<br><br>Mane, Dalit mitra Dr. Ashokrao (Bapu) (Haatkangale) | ५ | १ | ८३% |
| २१३.<br><br>213. | मिसाळ, श्रीमती माधुरी सतिश (पर्वती)<br><br>Misal, Smt. Madhuri Satish (Parvati) | **मा. राज्यमंत्री** | | |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २१४.<br><br>214. | मुटकुळे, श्री. तान्हाजी सखारामजी (हिंगोली)<br><br>Mutkule, Shri Tanhaji Sakharamji (Hingoli) | ६ | - | १००% |
| २१५.<br><br>215. | मुंडे, श्री. धनंजय पंडितराव (परळी)<br><br>Munde, Shri Dhananjay Panditrao (Parli) | **मा. मंत्री** | | |
| २१६.<br><br>216. | मुंदडा, श्रीमती नमिता अक्षय (केज)<br><br>Mundada, Smt. Namita Akshay (Cage) | ३ | ३ | ५०% |
| २१७.<br><br>217. | मुनगंटीवार, श्री. सुधीर सच्चिदानंद (बल्लारपूर)<br><br>Mungantiwar, Shri Sudhir Sachchi-danand (Ballarpur) | १ | ५ | १६% |
| २१८.<br><br>218. | खलिक, मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल (मालेगाव मध्य)<br><br>Khaliq, Mufti Mohammad Ismail Abdul (Malegaon Central) | ६ | - | १००% |
| २१९.<br><br>219. | मुश्रीफ, हसन मियालाल (कागल)<br><br>Mushrif, Hasan Mialal (Kagal) | **मा. मंत्री** | | |
| २२०.<br><br>220. | मेघे, श्री. समीर दत्तात्रय (हिंगणा)<br><br>Meghe, Shri Sameer Dattatreya (Hingana) | ६ | - | १००% |
| २२१.<br><br>221. | मेश्राम, श्री. संजय नारायणराव (उमरेड)<br><br>Meshram, Shri Sanjay Narayanrao (Umred) | ६ | - | १००% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २२२.<br>222. | मेहता, श्री. नरेंद्र (मिरा भाईंदर)<br>Mehta, Shri Narendra (Mira Bhayandar) | ६ | - | १००% |
| २२३.<br>223. | मोरे, श्री. राजेश गोवर्धन (कल्याण ग्रामीण)<br>More, Shri Rajesh Govardhan (Kalyan Rural) | ६ | - | १००% |
| २२४.<br>224. | मोरे, श्री. शांताराम तुकाराम (भिंवडी ग्रामीण)<br>More, Shri Shantaram Tukaram (Bhinwadi Rural) | ६ | - | १००% |
| २२५.<br>225. | म्हात्रे, श्रीमती मंदा विजय (बेलापूर)<br>Mhatre, Smt. Manda Vijay (Belapur) | ४ | २ | ६६% |
| २२६.<br>226. | मांगुळकर, श्री. अनिल उर्फ बाळासाहेब शंकरराव (यवतमाळ)<br>Mangulkar, Shri Anil alias Balasaheb Shankarrao (Yavatmal) | ६ | - | १००% |
| २२७.<br>227. | मांडेकर, श्री. शंकर हिरामण (भोर)<br>Mandekar, Shri Shankar Hiraman (Bhor) | ६ | - | १००% |
| २२८.<br>228. | यादव (लोणीकर), श्री. बबनराव दत्तात्रय (परतूर)<br>Yadav (Lonikar), Shri Babanrao Dattatreya (Paratur) | ५ | १ | ८३% |
| २२९.<br>229. | यावलकर, श्री. उमेश ऊर्फ चंदू आत्मारामजी (मोर्शी)<br>Yawalkar, Shri Umesh alias Chandu Atmaramji (Morshi) | ६ | - | १००% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २३०.<br><br>230. | रहांगडाले, श्री. विजय भरतलाल (तिरोरा)<br><br>Rahangdale, Shri Vijay Bharatlal (Tirora) | ५ | १ | ८३% |
| २३१.<br><br>231. | राऊत, डॉ. नितीन काशिनाथ (नागपूर उत्तर)<br><br>Raut, Dr. Nitin Kashinath (Nagpur North) | ६ | - | १००% |
| २३२.<br><br>232. | राऊत, श्री. सुनिल राजाराम (विक्रोळी)<br><br>Raut, Shri Sunil Rajaram (Vikhroli) | ४ | २ | ६६% |
| २३३.<br><br>233. | राजळे, श्रीमती मोनिका राजीव (शेवगाव)<br><br>Rajale, Smt. Monica Rajiv (Shevgaon) | ६ | - | १००% |
| २३४.<br><br>234. | राठोड, श्री. तुषार गोविंदराव (मुखेड)<br><br>Rathod, Shri Tushar Govindrao (Mukhed) | ५ | १ | ८३% |
| २३५.<br><br>235. | राठोड, श्री. संजय दुलिचंद (दिग्रस)<br><br>Rathod, Shri Sanjay Dulichand (Digras) | **मा. मंत्री** | | |
| २३६.<br><br>236. | राणा, श्री. रवि गंगाधरराव (बडनेरा)<br><br>Rana, Shri Ravi Gangadharrao (Badnera) | - | ६ | - |
| २३७.<br><br>237. | राणे, श्री. नितेश नारायण (कणकवली)<br><br>Rane, Shri Nitesh Narayan (Kanakavali) | **मा. मंत्री** | | |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २३८.<br><br>238. | राणे, श्री. निलेश नारायण (कुडाळ)<br><br>Rane, Shri Nilesh Narayan (Kudal) | २ | ४ | ३३% |
| २३९.<br><br>239. | रावल, श्री. जयकुमार जितेंद्रसिंह (शिंदखेडा)<br><br>Rawal, Shri Jayakumar Jitendra Singh (Shindkheda) | **मा. मंत्री** | | |
| २४०.<br><br>240. | रासने, श्री. हेमंत नारायण (कसबा पेठ)<br><br>Rasane, Shri Hemant Narayan (Kas-ba Peth) | ६ | - | १००% |
| २४१.<br><br>241. | लवटे, श्री.गजानन मोतीराम (दर्यापूर)<br><br>Lawate, Shri Gajan Motiram (Daryapur) | ६ | - | १००% |
| २४२.<br><br>242. | लहामटे, डॉ. किरण यमाजी (अकोले)<br><br>Lahamte, Dr. Kiran Yamaji (Akole) | ६ | - | १००% |
| २४३.<br><br>243. | लोढा, श्री. मंगलप्रभात गुमानमल (मलबार हिल)<br><br>Lodha, Shri Mangalprabhat Guman-mal (Malabar Hill) | **मा. मंत्री** | | |
| २४४.<br><br>244. | लंघे, श्री. विठ्ठल वकिलराव (नेवासा)<br><br>Langhe, Shri Vitthal Vakilrao (Nevasa) | ६ | - | १००% |
| २४५.<br><br>245. | लांडगे, श्री. महेश (दादा) किसन (भोसरी)<br><br>Landge, Shri Mahesh (Dada) Kisan (Bhosari) | ५ | १ | ८३% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २४६.<br><br>246. | लांडे, श्री. दिलीप भाऊसाहेब (चांदिवली)<br><br>Lande, Shri Dilip Bhausaheb (Chandivali) | ६ | - | १००% |
| २४७.<br><br>247. | वडेट्टीवार, श्री. विजय नामदेवराव (ब्रह्मपूरी)<br><br>Wadettiwar, Shri Vijay Namdevrao (Brahmapuri) | ६ | - | १००% |
| २४८.<br><br>248. | वळसे पाटील, श्री. दिलीप दत्तात्रय (आंबेगाव)<br><br>Walse Patil, Shri Dilip Dattatreya (Ambegaon) | २ | ४ | ३३% |
| २४९.<br><br>249. | वानखडे, श्री. राजेश श्रीरामजी (तिवसा)<br><br>Wankhade, Shri Rajesh Shriramji (Tivasa) | ६ | - | १००% |
| २५०.<br><br>250. | वानखेडे, श्री. किसन मारोती (उमरखेड)<br><br>Wankhede, Shri Kisan Maroti (Uma-rkheed) | ६ | - | १००% |
| २५१.<br><br>251. | वानखेडे, श्री. सुमित (आर्वी)<br><br>Wankhede, Shri Sumit (Arvi) | ४ | २ | ६६% |
| २५२.<br><br>252. | विखे पाटील, श्री. राधाकृष्ण एकनाथराव (शिर्डी)<br><br>Vikhe Patil, Shri Radhakrishna Eknathrao (Shirdi) | **मा. मंत्री** | | |
| २५३.<br><br>253. | विटेकर, श्री. राजेश उत्तमराव (पाथरी)<br><br>Vitekar, Shri Rajesh Uttamrao (Pathri) | ६ | - | १००% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २५४.<br>254. | वुईके, प्रा. डॉ. अशोक रामाजी (राळेगाव)<br>Wooike., Prof. Dr. Ashok Ramaji (Ralegaon) | **मा. मंत्री** | | |
| २५५.<br>255. | शाह, श्री. पराग (घाटकोपर पूर्व)<br>Shah, Shri Parag (Ghatkopar East) | ६ | - | १००% |
| २५६.<br>256. | शिंदे, श्री. एकनाथ संभाजी (कोपरी-पाचपाखाडी)<br>Shinde, Shri Eknath Sambhaji (Kopri-Pachpakhadi) | **मा. उप मुख्यमंत्री** | | |
| २५७.<br>257. | शिंदे, श्री. महेश संभाजीराजे (कोरेगाव)<br>Shinde, Shri Mahesh Sambhajiraje (Koregaon) | ५ | १ | ८३% |
| २५८.<br>258. | शिरसाट, श्री. संजय पांडुरंग (औरंगाबाद पश्चिम)<br>Shirsat, Shri Sanjay Pandurang (Aurangabad West) | **मा. मंत्री** | | |
| २५९.<br>259. | शिरोळे, श्री. सिध्दार्थ अनिल (शिवाजी नगर)<br>Shirole, Shri Siddharth Anil (Shivaji Nagar) | ६ | - | १००% |
| २६०.<br>260. | शिवतारे, श्री. विजयबापू (पुरंदर)<br>Shivtare, Shri Vijaybapu (Purandar) | ३ | ३ | ५०% |
| २६१.<br>261. | शेख, अस्लम रमजानअली (मालाड पश्चिम)<br>Sheikh, Shri Aslam Ramzan Ali (Malad West) | १ | ५ | १६% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २६२.<br>262. | शेख, रईस कासम (भिवंडी पूर्व)<br>Shaikh, Shri. Rais Kasam (Bhiwandi East) | ५ | १ | ८३% |
| २६३.<br>263. | शेलार, ॲड. आशिष (वांद्रे पश्चिम)<br>Shelar, Adv. Ashish (Bandra West) | **मा. मंत्री** | | |
| २६४.<br>264. | शेळके, श्री. सुनिल शंकरराव (मावळ)<br>Shelke, Shri Sunil Shankarrao (Maval) | ६ | - | १००% |
| २६५.<br>265. | सत्तार, अब्दुल (सिल्लोड)<br>Sattar, Abdul (Sillod) | २ | ४ | ३३% |
| २६६.<br>266. | सरदेसाई, श्री. वरुण सतिश (वांद्रे पूर्व)<br>Sardesai, Shri Varun Satish (Bandra East) | ६ | - | १००% |
| २६७.<br>267. | सरनाईक, श्री. प्रताप बाबुराव (ओवळा-माजिवडा)<br>Sarnaik, Shri Pratap Baburao (Ovala-Majiwada) | **मा. मंत्री** | | |
| २६८.<br>268. | साकोरे-बोर्डिकर, श्रीमती मेघना दिपक (जिंतुर)<br>Sakore-Bordikar Smt.Meghna Deepak (Jintur) | **मा. राज्यमंत्री** | | |
| २६९.<br>269. | सागर, श्री. योगेश (चारकोप)<br>Sagar, Shri Yogesh (Charkop) | ५ | १ | ८३% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २७०.<br><br>270. | साटम, श्री. अमित भास्कर (अंधेरी पश्चिम)<br><br>Satam, Shri Amit Bhaskar (Andheri West) | ६ | - | १००% |
| २७१.<br><br>271. | सामंत, श्री. उदय रविंद्र (रत्नागिरी)<br><br>Samant, Shri Uday Ravindra (Ratnagiri) | **मा. मंत्री** | | |
| २७२.<br><br>272. | सामंत, श्री. किरण उर्फ भैय्या (राजापूर)<br><br>Samant, Shri Kiran alias Bhaiya (Rajapur) | ६ | - | १००% |
| २७३.<br><br>273. | सावकारे, श्री. संजय वामन (भुसावळ)<br><br>Sawkare, Shri Sanjay Vaman (Bhusawal) | **मा. मंत्री** | | |
| २७४.<br><br>274. | सावरकर, श्री. रणधीर प्रल्हादराव (अकोला पूर्व)<br><br>Savarkar, Shri Randhir Prahlad Rao (Akola East) | ६ | - | १००% |
| २७५.<br><br>275. | सावे, श्री. अतुल मोरेश्वर (औरंगाबाद पूर्व)<br><br>Save, Shri Atul Moreshwar (Aurangabad East) | **मा. मंत्री** | | |
| २७६.<br><br>276. | सावंत, डॉ. तानाजी जयवंत (परांडा)<br><br>Sawant, Dr. Tanaji Jaywant (Paranda) | - | ६ | - |
| २७७.<br><br>277. | सावंत, श्री. महेश बळीराम (माहिम)<br><br>Sawant, Shri Mahesh Baliram (Mahim) | ६ | - | १००% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २७८.<br><br>278. | सुर्वे, श्री. प्रकाश (मागाठाणे)<br><br>Surve, Shri Prakash (Magathane) | २ | ४ | ३३ |
| २७९.<br><br>279. | सेल्वन, कॅप्टन आर. तमील (सायन कोळीवाडा)<br><br>Selvan, Captain R. Tamil (Sion Koliwada) | ५ | १ | ८३% |
| २८०.<br><br>280. | सोनवणे, श्री. चंद्रकांत बळीराम (चोपडा)<br><br>Sonwane, Shri Chandrakant Baliram (Chopda) | ५ | १ | ८३% |
| २८१.<br><br>281. | सोनवणे, श्री. शरददादा भिमाजी (जून्नर)<br><br>Sonawane, Shri Sharaddada Bhimaji (Junnar) | ५ | १ | ८३% |
| २८२.<br><br>282. | सोपल, श्री. दिलीप गंगाधर (बार्शी)<br><br>Sopal, Shri Dilip Gangadhar (Barshi) | ४ | २ | ६६% |
| २८३.<br><br>283. | सोळंखे, श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव (माजलगाव)<br><br>Solankhe, Shri Prakash (Dada) Sundarrao (Majalgaon) | ३ | ३ | ५०% |
| २८४.<br><br>284. | संचेती, श्री. चैनसुख मदनलाल (मलकापूर)<br><br>Sancheti, Shri Chainsukh Madanlal (Malkapur) | ६ | - | १००% |
| २८५.<br><br>285. | स्वामी, श्री. प्रविण विरभद्रया (उमरगा)<br><br>Swami, Shri Pravin Virabhadraya Umarga | ६ | - | १००% |

| अ.क्र. | नाव / सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २८६.<br><br>286. | हिरे, श्रीमती सीमा महेश (नाशिक पश्चिम)<br><br>Hire, Smt. Seema (Nashik West) | ६ | - | १००% |
| २८७.<br><br>287. | क्षिरसागर, श्री. राजेश विनायकराव (कोल्हापूर उत्तर)<br><br>Kshirsagar, Shri Rajesh Vinayakrao (Kolhapur North) | २ | ४ | ३३% |
| २८८.<br><br>288. | क्षिरसागर, श्री. संदिप रविंद्र (बीड)<br><br>Kshirsagar, Shri Sandeep Ravindra (Beed) | ४ | २ | ६६% |

***

# विवरण क्रमांक - ७

## सन २०२४ चे हिवाळी अधिवेशन (डिसेंबर, २०२४) कालावधीतील कार्यवाहीचा संक्षिप्त वृत्तांत

## सोमवार, दिनांक १६ डिसेंबर, २०२४

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभा सभागृहात सकाळी ११-०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**शुभारंभ**—अधिवेशनाचा शुभारंभ 'वंदे मातरम्' या गीताच्या समूह गायनाने झाला

त्यानंतर राज्यगीताचे समूह गायन झाले.

**१.** मुख्यमंत्र्यांनी पुढील नवनिर्वाचित सदस्यांचा सभागृहाला परिचय करून दिला—

(१) श्री. शेखर गोविंदराव निकम

(२) श्री. मनोज पांडुरंग जामसुतकर

(३) श्री. वरुण सतीश सरदेसाई

**२.** मुख्यमंत्र्यांनी पुढील मंत्री आणि राज्यमंत्र्यांचा सभागृहाला परिचय करून दिला—

(१) श्री. चंद्रशेखर कृष्णराव बावनकुळे

(२) श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील

(३) श्री. हसन मियालाल मुश्रीफ

(४) श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील

(५) श्री. गिरीश दत्तात्रय महाजन

(६) श्री. गणेश रामचंद्र नाईक

(७) श्री. गुलाबराव रघुनाथ पाटील

(८) श्री. संजय दुलिचंद राठोड

(९) श्री. धनंजय पंडितराव मुंडे

(१०) श्री. मंगलप्रभात लोढा

(११) श्री. उदय रवींद्र सामंत

(१२) श्री. जयकुमार जितेंद्रसिंह रावल

(१३) श्रीमती पंकजा गोपिनाथ मुंडे

(१४) श्री. अतुल मोरेश्वर सावे

(१५) प्रा. डॉ. अशोक रामाजी उईके

(१६) श्री. शंभुराज शिवाजीराव देसाई

(१७) ॲड. आशिष बाबाजी शेलार

(१८) श्री. दत्तात्रय विठोबा भरणे

(१९) श्रीमती आदिती सुनील तटकरे

(२०) श्री. शिवेंद्रराजे अभयसिंहराजे भोसले

(२१) ॲड. माणिकराव शिवाजी कोकाटे

(२२) श्री. जयकुमार भगवानराव गोरे

(२३) श्री. नरहरी सिताराम झिरवाळ

(२४) श्री. संजय पांडुरंग शिरसाट

(२५) श्री. प्रताप बाबुराव सरनाईक

(२६) श्री. मकरंद लक्ष्मणराव जाधव (पाटील)

(२७) श्री. नितेश नारायण राणे

(२८) श्री. आकाश पांडुरंग फुंडकर

(२९) श्री. बाबासाहेब मोहनराव पाटील

(३०) श्री. प्रकाश आनंदराव आबिटकर

**राज्यमंत्री**

(३१) श्रीमती माधुरी सतीश मिसाळ

(३२) श्री. आशिष नंदकिशोर जयस्वाल

(३३) श्री. पंकज राजेश भोयर

(३४) श्रीमती मेघना दीपक साकोरे-बोर्डीकर

(३५) श्री. इंद्रनील मनोहर नाईक

(३६) श्री. योगेशदारा रामदास कदम

**३.** श्री. उदय सामंत (मंत्री) यांनी, सन २०२४-२०२५ च्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर केल्या.

माननीय अध्यक्षांनी अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व या मागण्यांवर दिनांक १९ व २० डिसेंबर, २०२४ रोजी चर्चा व मतदान घेण्यात येईल, असे सांगितले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "बीड व परभणी येथे घडलेल्या घटना," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

गटनेत्यांसोबत बोलून या विषयावरील चर्चेचा दिवस ठरविण्यात येईल, असे मा. अध्यक्षांनी सांगितले.

**४. (अ) पुरस्थापनार्थ–**

**(१)** श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

**(२)** श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

**(३)** श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

**(४)** श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ – महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

**(५)** श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ – महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

**(६)** श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ – महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

**(७)** श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ – महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

**(८)** श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

**मंत्र्यांचा परिचय (पुढे सुरू)–**

मुख्यमंत्र्यांनी पुढील मंत्र्यांचा सभागृहाला परिचय करून दिला—

(१) श्री. दादाजी दगडू भुसे

(२) श्री. संजय वामन सावकारे

(३) श्री. भरत मारुती गोगावले

**अधिवेशनानिमित्त नागपूर शहरातील अनेक रस्ते बंद असणे—**

श्री. अनिल पाटील, वि.स.स. यांनी, “नागपूर शहरात पोलीस प्रशासनाने अडविलेले अनेक रस्ते मोकळे करणे,” इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

याबाबत उचित उपाययोजना केल्या जातील असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**५.** माननीय अध्यक्षांनी खालील सन्माननीय मान्यवरांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

“श्री. एस. एम. कृष्णा, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल व श्री. दिनकरराव भाऊसाहेब जाधव, माजी वि.स.स. यांच्या निधनाबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते.”

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली व शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

दिवंगत सदस्यांच्या शोकाकुल कुटुंबीयांकडे शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतिपत्र पाठविण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ३५ मिनिटांनी मंगळवार दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजीच्या सकाळी ११:०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

**मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२४**

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. माननीय अध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ८ च्या पोटनियम (१) अन्वये खालील सदस्यांची सभाध्यक्षांच्या तालिकेवर नामनियुक्ती केली :—

(१) श्री. विजय रहांगडाले

(२) श्री. रमेश बोरनारे

(३) श्री. शेखर निकम

(४) श्री. दिलीप सोपल

**२.** माननीय अध्यक्षांनी, श्री. दत्तात्रय महादेव राणे, माजी वि.स.स. व माजी मंत्री यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**३.** डॉ. नितीन राऊत, वि.स.स. व श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी, 'पोलिसांच्या लाठीचार्जमध्ये आंबेडकरी चळवळीतील सोममाथ सूर्यवंशी नावाच्या एका तरूण मुलाचा मृत्यू होणे.' इ. बाबत नियम ९७ व नियम ५७ अन्वये सूचना दिल्याचे सांगितले. तसेच नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित करता येऊ शकत असल्याचे सांगितले.

सदरहू विषयावर शासनाला चर्चा करावयाची असून सभागृहामध्ये नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चा बुधवारी करू, असे मानननीय अध्यक्षांनी सांगितले.

**४.** (१) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी 'औसा विधानसभा मतदारसंघामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री. संदीप क्षीरसागर, वि.स.स. यांनी, 'बीड जिल्ह्यात मस्साजोग येथे श्री. संतोष देशमुख नावाच्या सरपंचाचा दिवसाढवळ्या खून करण्यात येणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स. यांनी, 'बीड जिल्ह्यात मस्साजोग येथे श्री. संतोष देशमुख नावाच्या सरपंचाचा दिवसाढवळ्या खून केल्याच्या घटनेतील सात आरोपींपैकी केवळ ३ आरोपींना अटक होणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४) श्री. आमश्या पाडवी, वि.स.स. यांनी, 'अक्कलकुवा तालुक्यातील एका ग्रामपंचायतीत माझ्या मुलीला मारहाण करून माझ्यावरच विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात येणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

सन्माननीय सदस्य श्री. आमश्या पाडवी यांनी उपस्थित केलेल्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता तत्काळ वरिष्ठ स्तरावर चौकशी केली जाईल, असे निदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले.

(५) श्री. भीमराव तापकीर, वि.स.स. यांनी, 'बावधन कोकाटे वस्ती येथे एका उद्योजकाने दिनांक ८ डिसेंबर, २०२४ रोजी वाढदिवस पार्टीनिमित्ताने ध्वनीप्रदूषण निर्माण करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(६) श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी, 'पुण्यातील खराडी येथे विद्यार्थ्यांना शाळेतून ने-आण करणाऱ्या बसला आग लागणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(७) श्री. सुमित वानखेडे, वि.स.स. यांनी, ' वर्धा जिल्हा हा नागपूर एमआयडीसीच्या प्रादेशिक कार्यालयाशी संलग्न करणेबाबत शासनाने निर्णय घेणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(८) डॉ. किरण लहामटे, वि.स.स. यांनी, 'अकोले तालुक्यात निळवंडे धरणामुळे उद्भवलेल्या समस्यांबाबत शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन सुरु असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(९) श्री. महेश (दादा) लांडगे, वि.स.स. यांनी, 'मुंबईत आमदारांचा शपथविधी सुरु असताना पुण्यातील पिंपरी-चिंचवड शहरातील कुदळवाडी परिसरात भीषण आग लागणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१०) श्री. निलेश राणे, वि.स.स. यांनी, 'सिंधुदुर्गातील कणकवली मतदारसंघात कर्नाटक व आंध्र प्रदेशातून येणारे multi trawler स्थानिक मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

सदर प्रकरणी योग्य कारवाई करण्यात येईल, असे निदेश माननीय माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले.

(११) श्री. अबु आझमी, वि.स.स. (हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने हिंदी प्रतिवेदन उपलब्ध नाही.)

(१२) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी , 'मुंबईतील दहिसर गावठाणातील १,१११ रेल्वे प्रकल्पबाधित झोपडपट्टीधारकांना रेल्वे प्रशासनाकडून झोपडी निष्कासित करण्याबाबत वारंवार नोटीस बजावण्यात येणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१३) श्रीमती सुलभा खोडके, वि.स.स. यांनी 'माननीय मुख्यंमत्र्यांनी विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाला प्रति क्विंटल १०,००० रूपये हमी भाव देणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१४) श्रीमती सुनिल प्रभू ,वि.स.स. यांनी 'मुंबईतील दिंडोशी मतदारसंघात शिवशाही पुनर्वसन प्रकल्पातील ३३ इमारती मूलभूत सुविधांपासून वंचित असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१५) श्री. भास्कर जाधव , वि.स.स. यांनी, 'शासनाच्या विविध योजना आणि सोयी-सुविधांपासून हा मच्छीमार समाज अजूनही वंचित असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१६) श्री. काशिनाथ दाते, वि.स.स. 'नागपूरमध्ये दिव्यांगांनी शासनाकडून उदरनिर्वाहाकरिता मिळणाऱ्या अनुदानासंदर्भात आंदोलन करणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१७) श्री. रईस शेख, वि.स.स. (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने हिंदी प्रतिवेदन उपलब्ध नाही.)

(१८) श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी, 'इगतपुरी तालुक्यातील बाहुली धरणातील पाणी शहापूर येथे न नेणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१९) श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. यांनी, 'सन १९५० नंतर मराठवाड्यातील अनेकजण राजुरा मतदारसंघात जिवती तालुक्यात स्थलांतरित झाले असून त्या लोकांना तेव्हापासून आजपर्यंत वन जमिनीचे पट्टे न मिळणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२०) श्री. अमित साटम, वि.स.स. यांनी, 'मुंबईत डी.एन. नगरच्या जमिनीवर असलेल्या एअरपोर्ट ॲथोरेटी ऑफ इंडियाच्या ट्रान्समिशन टॉवरला गोराई येथील मुंबई महानगरपालिकेच्या जागेवर स्थलांतरित करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२१) श्री. शरददादा सोनावणे, वि.स.स. यांनी, 'छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झालेल्या किल्ले शिवनेरी या मतदारसंघाला पर्यायाने शिवछत्रपतींच्या शिवभूमीला राज्याच्या मंत्रिमंडळात हक्काचे स्थान न मिळणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२२) श्री. राम कदम, वि.स.स. यांनी, 'राज्यासह मुंबईच्या घाटकोपर मतदारसंघात गेल्या अनेक वर्षांपासून लॅबोरेटरी, हॉस्पिटल येथे रूग्णांच्या तपासणीकरिता सुरु असलेली कट प्रॅक्टीस बंद करण्याची आवश्यकता तसेच घाटकोपर येथील जनतेसाठी महानगरपालिकेकडून मंजूर केलेल्या पाण्याच्या टाक्या बांधणे तसेच एलबीएस रोडवर आर सिटी मॉल ते कुर्ला, बैल बाजारला जोडणारा ४.२ कि.मी. लांबीचा ७०० कोटी रूपयांच्या मंजूर करून घेतलेल्या पुलाचे कामही लवकरात लवकर सुरु करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२३) श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी, 'राज्यातील व विशेषतः मुंबईतील वीज ग्राहकांकडून अदानी कंपनीच्या स्मार्च मीटरला होणारा विरोध लक्षात घेऊन बेस्टसोबतचा करार रद्द करण्याची आवश्यकता तसेच विधानसभा सदस्यांना यंदा विधानंडळाकडून दिलेले बिल्ले अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून त्यांची फिनिशिंग देखील चांगली नसणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२४) श्री. संजय पोतनीस, वि.स.स. यांनी, 'दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी मुंबई शहरातील कुर्ला रेल्वे स्टेशन जवळील आंबेडकर नगर येथे रात्री ८.०० ते ९.०० वाजताच्या सुमारास भरधाव वेगाने जाणाऱ्या बेस्ट बसवरील चालकाचे नियंत्रण सुटून भीषण अपघात होऊन सातपेक्षा अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून ४२ जण गंभीर जखमी होणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२५) श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी,' मुंबई शहरातील भाडोत्री इमारतींचा पुनर्विकासाचा प्रश्न म्हाडा किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून न सुटणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२६) श्री. देवेंद्र कोठे, वि.स.स. यांनी, 'सोलापूर शहरासाठी उजनी ते सोलापूर या दुहेरी पाईपलाईनचे काम अनेक वर्षांपासून संथ गतीने सुरु असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२७) श्री. कैलास घाडगे-पाटील, वि.स.स. यांनी, 'मागील दोन महिन्यांपासून धाराशिव जिल्ह्यामध्ये मुक्त वावर करणाऱ्या बिबट्यांनी काही शेतकऱ्यांवर हल्ला केला असून काही शेतकऱ्यांच्या पशुधनाचे नुकसान केलेले असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२८) श्री. किसन वानखेडे, वि.स.स. यांनी, 'उमरखेड मतदारसंघातून वाहणाऱ्या पैनगंगा नदीत उन्हाळ्यात पाणी नसल्याने तेथील कॅनॉलला व्यवस्थितरित्या पाणी सोडण्याचे नियोजन करून नदीपात्रात पशुंसाठी आणि शेतकऱ्यांसाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२९) श्री. जितेश अंतापूरकर, वि.स.स. यांनी, 'राज्यातील शेतकऱ्यांना शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेले वीज जोडणी अर्ज महावितरण कंपनीने Online अथवा Offline उपलब्ध करून देणे आवश्यक असताना संबंधित कर्मचारी शेतकऱ्यांना सौर ऊर्जा कनेक्शन्स घेण्याची सक्ती करीत असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३०) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, 'ठाणे शहरामध्ये विशेषकरुन घोडबंदर भागामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नेहमीच भेडसावत असून त्या ठिकाणी टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असल्याने तेथील निरनिराळ्या सोसायट्यांना लाखो रुपये मोजावे लागणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

**५. शासकीय विधेयके-(पुरःस्थापनार्थ)—**

**(१)** मुख्यमंत्र्यांनी, सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक ३०—महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक,२०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

**(२)** मुख्यमंत्र्यांनी, सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक ३१—महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक,२०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

माननीय अध्यक्षांनी सन्माननीय सदस्यांनी पाळावयाचे सभ्याचार याबाबत पुढील घोषणा केली-

" सभागृहाच्या कामकाजात भाग घेतेवेळी सन्माननीय सदस्यांनी पाळावयाचे संसदीय सभ्याचार, शिष्टाचार आणि आचारसंहिता याबाबत 'संसदीय सभ्याचार आणि शिष्टाचार, आचारसंहिता' या

विषयाची पुस्तिका सर्व सदस्यांना त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणाव्दारे वितरित करण्यात आली आहे.तसेच सदर पुस्तिका विधिमंडळाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.''

**६. राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा–**

माननीय अध्यक्षांनी, मानननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

प्रस्तावावरील चर्चा सुरु झाली.

उपरोक्त चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. पराग अळवणी
(२) श्री. चेतन तुपे
(३) श्री. भास्कर जाधव
(४) श्री. सुरेश धस
(५) श्री. तुकाराम काते
(६) डॉ. किरण लहामटे
(७) श्री. रईस शेख
(८) श्री. प्रवीण दटके
(९) श्री. संजय गायकवाड
(१०) श्री. शेखर निकम
(११) श्री. सुनिल प्रभू
(१२)श्री. अतुल भातखळकर
(१३) श्री. निलेश राणे

(चर्चा अपूर्ण)

**७. शासकीय विधेयके (विचार, खंडशः विचार व संमत करणे)**

**(१) सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक २२–महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती या पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे विधेयक, २०२४ विधेयक–**

श्री. संजय मेश्राम, वि.स.स.यांचा, सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११– महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती या पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे अध्यादेश, २०२४ नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

श्री. गिरीश महाजन (मंत्री) यांनी, सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक २२–महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती या पदांच्या ) निवडणुका तातुरत्या पुढे ढकलणे विधेयक, २०२४ विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सर्वश्री नाना पटोले, विजय वडेट्टीवार, डॉ. नितीन राऊत, अस्लम शेख, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री अमित झनक, अमिन पटेल व विकास ठाकरे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(२) सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक २४–श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था(प्रभादेवी) (सुधारणा) विधेयक, २०२४.**

श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५— श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

श्री. जयकुमार रावल (मंत्री) यांनी, सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक २४—श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था(प्रभादेवी) (सुधारणा) विधेयक, २०२४ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव , डॉ. नितीन राऊत , अस्लम शेख,डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री नाना पटोले, विजय वडेट्टीवार, सर्वश्री अमित झनक, अमिन पटेल व विकास ठाकरे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरु झाली.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत श्री. भास्कर जाधव , वि.स.स. यांनी भाग घेतला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

३) सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक २३—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२४.

श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

श्री. उदय सामंत (मंत्री), सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक २३—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२४ विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव , सर्वश्री नाना पटोले, विजय वडेट्टीवार, सर्वश्री अमित झनक, अमिन पटेल व विकास ठाकरे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

उपरोक्त विधेयकावरील भाषणात चर्चेत श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी भाग घेतला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**४)** सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७—महाराष्ट्र झाडे तोडण्यास (नियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२४.

श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७—महाराष्ट्र झाडे तोडण्यास (नियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

श्री. उदय सामंत (मंत्री) यांनी, सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक २५—महाराष्ट्र झाडे तोडण्यास (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४ विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सर्वश्री नाना पटोले, विजय वडेट्टीवार, डॉ. नितीन राऊत, अस्लम शेख, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री अमित झनक, अमिन पटेल व विकास ठाकरे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला—

१) श्री. भास्कर जाधव

२) श्री. शेखर निकम

सदरहू विधेयकातील दंडाच्या रकमेच्या तरतुदीबाबत चर्चा करून व सभागृहाची भावना लक्षात घेऊन योग्य ते विधेयक सादर करण्यात येईल, असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी केलेल्या विनंतीनुसार सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक २५ आपण स्थगित असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

५) सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक २६—महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) २०२४ .

श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६—महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

श्री. शंभूराज देसाई (मंत्री), सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक २६—महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२४ विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सर्वश्री नाना पटोले, विजय वडेट्टीवार, डॉ. नितीन राऊत, अस्लम शेख, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री अमित झनक, अमिन पटेल व विकास ठाकरे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी भाग घेतला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

६) सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक २७—महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४.

श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४—महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (मंत्री), सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक २७—महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सर्वश्री नाना पटोले, विजय वडेट्टीवार, डॉ. नितीन राऊत, अस्लम शेख, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री अमित झनक, अमिन पटेल व विकास ठाकरे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

७) सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक २८—प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक,२०२४.

श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८—प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

श्री. गिरीश महाजन (मंत्री), सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक २८—प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव, सर्वश्री नाना पटोले, विजय वडेट्टीवार, डॉ. नितीन राऊत, अस्लम शेख, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री अमित झनक, अमिन पटेल व विकास ठाकरे, वि.स.स. यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

उपरोक्त विधेयकावरील भाषणात खालील सदस्यांनी भाग घेतला—

१) श्री. आदित्य ठाकरे
२) श्री. शरददादा सोनावणे

माननीय मुख्यमंत्र्यांनी, "सन्माननीय सदस्य शरददादा सोनावणे यांनी अतिशय चांगला मुद्दा मांडला आहे. शिवनेरी आणि रायगड किल्ल्यावर मोठा भगवा ध्वज लावला पाहिजे. शासन निश्चितपणे त्याची परवानगी पुरातत्त्व विभागाकडून घेतली जाईल आणि त्यांच्या परवानगीने अतिशय उंच अशा प्रकारचा स्वराज्याचा ध्वज या दोन्ही किल्ल्यांवर लावण्यात येईल. अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या दुसऱ्या मुद्याबाबत जरुर सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल." असे सभागृहास सांगितले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**८)** सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक २९—हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४.

श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८—हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करण्याबाबतचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (मंत्री), सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक २९—हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घ्यावयाच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत श्री. कैलास घाडगे-पाटील, वि.स.स. यांनी भाग घेतला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

१) श्री. हरीश पिंपळे, वि.स.स. यांनी, 'अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर मतदारसंघातील बार्शी टाकळी येथे मोठ्या प्रमाणावर गोहत्या प्रकरण सुरु असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

२) कॅप्टन आर. तमिल सेल्वन (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने हिंदी प्रतिवेदन उपलब्ध नाही.)

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा पुढे सुरु झाली.

उपरोक्त चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

१४) श्री. शरददादा सोनवणे	१५) ॲड. राहुल कुल

(चर्चा अपूर्ण)

**सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून ४४ मिनिटांनी बुधवार, दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजीच्या सकाळी ११-०० वाजेपर्यंत स्थगित झाली.**

## बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२४

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता **माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर** यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली.

श्री. नानाभाऊ पटोले वि.स.स. यांनी, विधानसभा सदस्यांना दिलेले बिल्ले निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे संबंधितावर योग्य ती कारवाई होण्याची आवश्यकता, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

**१.** उप मुख्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**२.** माननीय अध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम ८ च्या पोट-नियम (१) अन्वये खालील सदस्यांची सभाध्यक्षांच्या तालिकेवर नामनियुक्ती केली.

१. श्री. चैनसुख संचेती, वि.स.स.

**३.** आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावांच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारल्याचे माननीय अध्यक्षांनी घोषित केले.

(१) श्री. चंद्रदीप नरके वि.स.स. यांनी, “कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यासंदर्भातील कार्यवाही सुरु केलेली असणे”, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

(२) श्री. अबु आझमी (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे हिंदी प्रतिवेदन उपलब्ध नाही.)

(३) डॉ. नितीन राऊत वि.स.स. यांनी, “राज्यसभेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा केलेला उल्लेख”, इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

यासंदर्भात तपासून निर्णय घेण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**४.** (१) श्री. कैलास घाडगे-पाटील, वि.स.स. यांनी, “धाराशिव जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पवनचक्क्यांची कामे सुरु असून खासगी कंपन्या बाउन्सर नेमून आणि पोलिसांना हाताशी धरून शेतकऱ्यांना दमदाटी करीत असणे, त्यामुळे शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची आवश्यकता”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी, “बुलढाणा जिल्ह्यात गेल्या ६ महिन्याच्या कालावधीत जातीय दंगली, लाखो मोटार सायकली चोरीला जाणे तसेच घरफोड्या, चोऱ्या, वाटमारी, अवैध दारु आणि गावठी दारु विक्री, गोवंशाची सर्रास हत्या आणि खुलेआम तस्करीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलेले असणे”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३) श्री. राजन नाईक, वि.स.स. यांनी, “वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख ४ रेल्वे ओव्हर ब्रिजला बांधण्याच्या प्रस्तावास राज्य शासनाने तातडीने मंजूरी देण्याची आवश्यकता”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४) श्री. अमोल जावळे, वि.स.स. यांनी, “रावेर विधानसभा क्षेत्रातील ७.५ अश्वशक्तीपेक्षा जास्त क्षमतेच्या ग्राहकांना वीज बिल माफी देण्यात यावी तसेच सौर ऊर्जा कृषी पंपांमुळे परंपरागत वीज कृषी पंप दिले जात होते ते बंद करण्यात आले असणे”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५) श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके, वि.स.स. यांनी, “शिरूर हवेली विधानसभा मतदारसंघात नगर रोड, वाघोली परिसर आणि सोलापूर रोड येतात. त्यामुळे त्या भागात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असणे तसेच या भागात बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे या भागातील बिबट्यांचा बंदोबस्त होणे फार गरजेचे असणे”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(६) श्री. सत्यजीत देशमुख, वि.स.स. यांनी, “शिराळा विधानसभा मतदार संघातील हिंस्त्र व वन्य जीव प्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यामुळे गाव, वाड्यावस्तीतील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असणे, त्याअनुषंगाने वन्य प्राण्यांच्या वाढत्या गंभीर घटना रोखण्यासह तसेच त्यांच्या हल्ल्यांमुळे झालेल्या जखमींना तातडीची आर्थिक मदत करण्यासह हल्ल्याच्या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांना तसेच शेतीचे नुकसान झालेल्यांना त्वरित आर्थिक मदत करून स्थानिकांना दिलासा देण्याबाबत शासनाने योग्यती कार्यवाही करावी”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(७) श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी, “जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रामध्ये भोकन ब्राम्हणवाडी येथील जयंत चाळीच्या पुनर्वसनादरम्यान तेथील परिसरातील लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी सर्वेक्षण करीत असतांना त्यावेळी १८ घरातील लोक अनुपस्थित असल्यामुळे त्या खोल्यांचे सर्वेक्षण झालेले नसल्यामुळे महानगरपालिका तेथील लोकांचे पुनर्वसन करीत नाही. त्यामुळे शासनाने याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करून सदर १८ घरांचे देखील पुनर्वसन करण्याची आवश्यकता”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(८) श्री. महेश बालदी, वि.स.स. यांनी, “त्यांच्या मतदारसंघामध्ये सिडकोमार्फत नैना प्रकल्पाचे काम सुरू असून सिडकोचे विद्यमान व्यवस्थापकीय संचालक यांनी नैना प्रकल्पासाठी आतापर्यंत शेतकरी तसेच लोकप्रतिनिधींसमवेत एकही बैठक घेतलेली नसणे, त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना व तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच सदर प्रकल्पाचे काम पुढे सुरू ठवण्याची आवश्यकता”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(९) श्री. हारुण खान, वि.स.स. यांनी, “अंधेरी व मुंबई येथे लोखंडवाला लेक म्हणून प्रसिद्ध असलेला तलाव देखभालीकरिता स्वायत्त संस्थेकडे देण्यात येऊन त्यांचे सुशोभिकरण करण्याकरिता जिल्हा नियोजन समिती मधून निधीची तरतूद करावी”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१०) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. यांनी, “गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यात व गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात बंगाली हिंदू बांधव स्थायिक झालेले असून सन १९८५ पर्यंत या लोकांना महाराष्ट्रात अनुसूचित जातीच्या सवलती मिळत होत्या. परंतु कालांतराने त्या बंद करण्यात आल्यामुळे त्यांना अनुसूचित जातीच्या सवलती देणेबाबत निर्णय घ्यावा, तसेच या लोकांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) चे प्रमाणपत्र देण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात रहिवासी असण्याबाबतची दिनांक १३ ऑक्टोबर, १९६७ ची मानांकित तारीख शिथिल करावी”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(११) श्री. अजय चौधरी, वि.स.स. यांनी, “मुंबईतील ७०० चौरस फुटांच्या घरांना व निवासी गाळे यांना मालमत्ता कर पूर्णपणे माफ करावा”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१२) श्री. मोहन मते, वि.स.स. यांनी, “राज्य कामगार विमा योजनेमार्फत अल्प वेतन असणाऱ्या सर्व क्षेत्रातील कामगारांना व त्यांच्या कुटुंबीयांना अद्ययावत वैद्यकीय सेवा मिळत नसणे, तसेच नागपूर येथील राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

विधानसभा सभागृहाचे कामकाज आपण पेपरलेस करणार आहोत. त्यामुळे या यंत्रणेचा परिचय करून घेण्याची विनंती माननीय अध्यक्षांनी सर्व सन्माननीय सदस्यांना केली.

**औचित्याचे मुद्दे**—(पुढे सुरू..)

(१२) श्रीमती सुलभा गायकवाड, वि.स.स. यांनी, “कल्याण पूर्व शहरातील रुग्णालयासाठी आरक्षित असलेला भूखंड ताब्यात घेऊन तातडीने अद्ययावत रुग्णालय उभारण्यात यावे”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१३) श्री. महेंद्र थोरवे, वि.स.स. यांनी, “त्यांच्या मतदारसंघातील पेण अर्बन को-ऑप. बँकेमध्ये आर्थिक घोटाळा झाल्याने ती सन २०१० मध्ये बंद करण्यात आली, त्यामुळे ठेवीदारांच्या ६१० कोटी रूपयांच्या बुडालेल्या ठेवीतील पैसे परत मिळण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता”, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१४) श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स. यांनी, "वडगाव शेरी मतदारसंघातील रोहगाव, ता. हवेली, जि. पुणे येथे जानेवारी, २०१३ मध्ये जिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात आले होते. परंतु, अद्यापही या हॉस्पिटलसह इतर काम पूर्ण झालेले नसणे", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१५) श्री. सुहास बाबर, वि.स.स. यांनी, "खानापूर विधानसभा मतदारसंघातील आटपाडी तालुक्यातील शेटफळे येथे महावितरण कंपनीने ३.५ कोटी रुपये खर्च करून ३३ के.व्ही.उप केंद्र उभारुन देखील ११ गावातील लोक उक्त विजेच्या खांबा अभावी वीज मिळण्यापासून वंचित असणे", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१६) श्री. प्रविण दटके, वि.स.स. यांनी, "स्वच्छता अभियानांतर्गत नागपूर शहरातील स्वच्छता व्यवस्थापनासाठी नियुक्त केलेल्या ए.जी.एन्टरप्रायजेस व बीव्हीजी इंडिया लि. या दोन कंपन्यांच्या कार्यपद्धतीबाबत गंभीर अनियमितता व मनमानीची प्रकरणे समोर येत असणे", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१७) श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स. यांनी, "श्रीगोंदा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात बिबट्यांचा वावर वाढलेला आहे, त्यामुळे जनतेमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झालेले असणे तसेच आमदार महोदयांच्या शपथविधीच्या कार्यक्रमात त्यांचा नामोल्लेख विक्रम ऐवजी विकास असा चुकीचा करण्यात आला असणे", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१८) कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. (प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने प्रतिवेदन उपलब्ध नाही.)

(१९) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स. यांनी, "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत काम करणाऱ्या प्रशिक्षणार्थी युवक-युवतींचे तीन महिन्यापासूनचे थकलेले वेतन तात्काळ देण्यात यावे", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२०) श्री. अशोक पाटील, वि.स.स. यांनी, "भांडुप विधानसभा क्षेत्रामध्ये दिनांक २७ नोव्हेंबर, २०२४ रोजी जी.एस. शेट्टी इंटरनॅशनल स्कुलमध्ये एका लिफ्टमनने दहा ते बारा वर्षांच्या तीन मुलींचा केलेला विनयभंग", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

सदर बाब अतिशय गंभीर असून शासनाने याची नोंद घेऊन अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहामध्ये याबाबतचे निवेदन करावे, असे निदेश माननीय अध्यक्षांनी दिले.

शासनाने याबाबत नोंद घेतली.

(२१) श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स. यांनी, "ओशिवरा येथून गोरेगाव पश्चिम येथील भगतसिंग नगर क्रमांक १, २ व ३ येथे होणाऱ्या पुलामुळे २,५०० हून जास्त झोपडीधारक रहिवासी बेघर होणार असणे, त्यामुळे त्यांना गोरेगावात किंबहुना तेथेच पुनर्वसित करून प्रकल्प बाधितांसाठीची आवश्यक घरे उपलब्ध करून देण्यात यावी, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२२) श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी, "बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जमिनीवर, दिंडोशी मतदार संघातील झोपड्यांचे पुनर्वसन व तेथील मूलभूत सुविधा", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२३) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, "रत्नागिरी जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेतील कामांचा उडालेला बोजवारा आणि जिल्ह्याचा टंचाई आराखडा वेळेत तयार न होणे", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२४) श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी, "त्यांच्या मतदारसंघात टोरेंट वीज कंपनीने लोकांना विश्वासात न घेता त्यांचे जुने मीटर काढून तेथे नवीन स्मार्ट मीटर बसविले असल्याने अधिक वीज बिल येत आहे. यामुळे टोरेंट कंपनी बंद करावी". इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२५) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, "औसा विधानसभा मतदारसंघात रोहयो ९५०५ लेखाशीर्षांतर्गत जवळपास प्रत्येक गावात अंतर्गत सिमेंट/पेव्हर ब्लॉक व रस्त्यांची कामे शासनाने मंजूर केलेली असून ती पूर्ण झालेली आहेत. परंतु सदरहू कामाची देयके आयुक्त, रोहयो यांच्याकडे अद्याप प्रलंबित असणे", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२६) श्री. विश्वजीत कदम, वि.स.स. यांनी, "पलूस-कडेगाव विधानसभा मतदारसंघातील व कडेगाव तालुक्यातील ताकारी योजनेच्या संदर्भात पाटबंधारे विभागाचे संबंधित अधिकारी, शेतकरी, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच व लोकप्रतिनिधी या सर्वांची एक संयुक्त बैठक घेण्याची आवश्यकता", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२७) श्री. शंकर मांडेकर, वि.स.स. यांनी, "त्यांच्या मतदारसंघातील भोर, राजगड, मुळशी या भागातील तरूणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नसणे", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२८) श्रीमती सना मलिक, वि.स.स. यांनी, "नीळकंठ गार्डन, देवनार हाऊस आणि त्रीधातू मोरया याबरोबरच अनेक रहिवाशी संकुलांच्या जवळ असलेला RMC प्लांट अविरतपणे सुरू असल्यामुळे तेथील ५० हजारांपेक्षा जास्त रहिवाशांच्या पर्यावरण व आरोग्यविषयक समस्या निर्माण होणे", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२९) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी, "बोकारो पोलाद प्रकल्प, झारखंड, फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, दिल्ली, स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया लि., भारत सरकार यासह इतर सरकारी विभागांमध्ये नोकरी लावण्याचे स्वप्न दाखवून महाराष्ट्र राज्यातील अनेक बेरोजगार तरुणांची फसवणूक करण्यात आली असणे", इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

**५.** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. रमेश बोरनारे (२) श्री. काशिनाथ दाते

(३) श्रीमती नमिता मुंदडा (४) श्री. अमिन पटेल

(चर्चा अपूर्ण..)

श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर सही करणारे अनेक सन्माननीय सदस्य अनुपस्थित असणे,

**माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा (चर्चा पुढे सुरू..)**

उपरोक्त चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(५) श्री. दिलीप लांडे (६) श्री. राजकुमार बडोले

(७) श्री.संदिप क्षीरसागर (८) श्री. सत्यजित देशमुख

(९) श्री. सुहास बाबर

(चर्चा अपूर्ण..)

माननीय तालिका सभाध्यक्षांनी पुढील घोषणा केली—

सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, १५ व्या विधानसभेचे नागपूर येथे सध्या सुरू असलेले अधिवेशन हे या विधानसभेचे नागपूर येथील पहिले अधिवेशन असून प्रथेप्रमाणे, माननीय अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मंत्री, माननीय गटनेते, माननीय मुख्य प्रतोद, माननीय प्रतोद व विधानसभेचे सर्व माननीय सदस्य यांचे एकत्रित छायाचित्र गुरूवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता विधानसभा सभागृहासमोरील पायऱ्यांवर काढण्यात येणार आहे.

सर्व मान्यवरांनी एकत्रित छायाचित्राच्या कार्यक्रमासाठी विधानसभा सभागृहासमोरील पायऱ्यांवर वेळेवर उपस्थित रहावे.

**माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा (चर्चा पुढे सुरू..)**

उपरोक्त चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१०) मुक्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (११) श्री. सचिन पाटील

(१२) श्री. कैलास घाडगे-पाटील (१३) श्रीमती स्नेहा दुबे पंडित

(चर्चा अपूर्ण..)

म.वि.स. नियम २९३ अन्वयेच्या प्रस्तावावर सही करणारे अनेक सन्माननीय सदस्य अनुपस्थित असणे, या संबंधी श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी वैयक्तिक स्पष्टीकरण केले.

**माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा (चर्चा पुढे सुरू..)**

उपरोक्त चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१४) श्रीमती मंजुळा गावित (१५) श्री. वरूण सरदेसाई

(चर्चा अपूर्ण..)

**६. (अ) पुरःस्थापनार्थ—**

मुख्यमंत्र्यांनी पुढील विधेयके सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केली.

**(१)** सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ३२—महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा व विधीग्राह्यीकरण) विधेयक, २०२४

**(२)** सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ३३—महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४

**(३)** सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ३४—महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२४.

**माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा (चर्चा पुढे सुरू..)**

उपरोक्त चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१६) श्री. मनोज जामसुतकर
(१७) श्री. बबनराव यादव (लोणीकर)
(१८) श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली कटके
(१९) श्रीमती सीमा हिरे
(२०) श्री. विजय वडेट्टीवार
(२१) श्री. राजन नाईक
(२२) श्रीमती मनिषा चौधरी
(२३) श्री. अबु आझमी
(२४) श्री. गजानन लवटे
(२५) श्री.विनोद अग्रवाल
(२६) श्री.हिरामण खोसकर

(चर्चा अपूर्ण..)

श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, "एमबीए, इंजिनिअरींग किंवा अशा प्रकारच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या सीईटी परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी उर्वरित १४२१ विद्यार्थ्यांना काही तांत्रिक कारणामुळे SEBC प्रमाणपत्र सादर करता आले नसणे", इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला विषय महत्त्वाचा असल्यामुळे शासनाने याची नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी याबाबत खुलासा केला.

**माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा (चर्चा पुढे सुरू..)**

उपरोक्त चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२७) डॉ. नितीन राऊत
(२८) डॉ. बाबासाहेब देशमुख
(२९) श्री. अभिजीत पाटील
(३०) श्री. सिद्धार्थ खरात
(३१) श्री. रोहित पाटील
(३२) डॉ. अतुलबाबा भोसले

(३३) डॉ. ज्योती गायकवाड (३४) श्री. प्रविण स्वामी

(३५) श्री. बापूसाहेब पठारे (३६) श्रीमती सुलभा खोडके

(३७) श्री. अमोल खताळ (३८) श्री. अनंत (बाळा) नर

(३९) सना मलिक (४०) श्री. हारुन खान

(४१) श्री. गोपिचंद पडळकर (४२) श्री. सिद्धार्थ शिरोळे

(४३) श्री. मनोज कायंदे

(चर्चा अपूर्ण..)

**७.** श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री ) यांनी, कामकाज सल्लागार समितीच्या बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त सभागृहास सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

इतिवृत्त संमत झाले.

**शासकीय विधेयके-** (पुढे सुरू..)

**(ब) विचार खंडशः विचार व संमत करणे —**

**(१)(क) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :—**

“ही विधानसभा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९—महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करते.”

उपरोक्त प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) यांनी, सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ३० – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२४ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

विधेयकावरील चर्चेत श्री. सुनील प्रभू व श्री. सुरेश धस वि.स.स. यांनी भाग घेतला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ ते ४१ (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(२) (क) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :—**

"ही विधानसभा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२—महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करते."

उपरोक्त प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) मुख्यमंत्र्यांनी, सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ३१—महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२४ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(क) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे.

(१) (क) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४.

अध्यादेश नापसंत करण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्यी श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक ११ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत श्री. भास्कर जाधव व श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. यांनी भाग घेतला.

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(२) (ख) श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक १२ – महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुरूस्ती सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.**

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(३) (ग) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :—**

"ही विधानसभा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८—महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ ( दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करते."

उपरोक्त प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक ९—महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२४ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(२) (क) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :—**

"ही विधानसभा सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३—महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) अध्यादेश, २०२४ नापसंत करते."

उपरोक्त प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

**(ख)** श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी, सन २०२४ चे वि.प.वि. क्रमांक १०–महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सुधारणा) विधेयक, २०२४ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरुवात करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. भास्कर जाधव, (२) श्री. आदित्य ठाकरे

(३) डॉ. नितीन राऊत, (४) श्री. नानाभाऊ पटोले

(५) श्री. सुनिल प्रभू

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री) यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री. आदित्य ठाकरे वि.स.स. यांनी, "उरण-कारंजा येथे बुडालेल्या बोटीमध्ये अंदाजे ३० ते ३५ लोक असल्याची माहिती मिळाली आहे, त्यासंदर्भातील सविस्तर माहिती सभागृहाला द्यावी", इ. बाबत माहितीचा मुद्दा मांडला.

मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

**माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा (चर्चा पुढे सुरू..)**

उपरोक्त चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(४४) श्री. हेमंत ओगले (४५) श्री. संजय देरकर

(४६) श्री. रामदास मसराम (४७) साजिद पठाण

(४८) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजाभाऊ नवघरे (४९) श्री. बाबाजी काळे

श्री. महेश बालदी, वि.स.स. यांनी, "मुंबईहून एलिफंटा येथे जात असलेल्या बोटीमध्ये बुडून मृत्यू पावलेल्या व्यक्तींना भरीव मदत मिळणे", इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

**८.** सर्वश्री. नानाभाऊ पटोले, सुनिल प्रभू, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री. संदिप क्षीरसागर, अबु आझमी, वि.स.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

डॉ. नितीन राऊत वि.स.स. यांनी पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा परिसरातील संविधान प्रतिकृतीची तोडफोड करण्यात आल्याने परभणी शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०२४ रोजी व त्यासुमारास निदर्शनास येणे, या प्रकरणी नवामोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविलेला असणे, या घटनेच्या निषेधार्थ पुकारलेल्या बंदला हिंसक वळण लागून खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्यासह जनजीवन विस्कळीत होणे, या प्रकरणी शहरातील अनेकांची पोलिसांनी धरपकड केली असणे, दगडफेक प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या विधि महाविद्यालयामधील विद्यार्थी असलेल्या तरुणाचा कारागृहात दिनांक १५ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास येणे, या घटनेमुळे आंदोलन पुन्हा सुरु होणे, तसेच बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच यांचे दिनांक ९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास अपहरण करून हत्या करण्यात आलेली असणे, या गुन्ह्यातील सात आरोपींना अटक करण्यात येणे मात्र या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधाराला अद्याप अटक झालेली नसणे, यामुळे जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, या दोन्ही गंभीर घटनांची शासनाने तातडीने चौकशी करून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपरोक्त अल्पकालीन चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्रीमती नमिता मुंदडा
(२) श्री. राजकुमार बडोले
(३) डॉ. राहुल पाटील
(४) श्री. सुरेश धस
(५) श्री. जितेंद्र आव्हाड
(६) श्री. अभिमन्यू पवार
(७) श्री. नानाभाऊ पटोले (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण..)

सभागृहाची बैठक रात्री ८ वाजून १ मिनिटांनी गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजीच्या सकाळी ९.३० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## गुरूवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४

विधानसभेची विशेष बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ९.३० वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. रमेश बोरनारे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सर्वश्री नाना पटोले व इतर वि.स.स. यांनी, "परभणी व बीड येथे घडलेल्या गंभीर घटनांची चौकशी करून कारवाई व उपाययोजना करणे" या विषयावर उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा – (चर्चा पुढे सुरू)

या चर्चेवर काल सन्माननीय सदस्य श्री. नानाभाऊ पटोले यांना ऑन लेग ठेवण्यात आले होते तथापि ते उपस्थित नसल्यामुळे आता पुढील सन्माननीय सदस्य श्री. संदिप क्षीरसागर यांनी त्यांच्या भाषणास सुरुवात करावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त अल्पकालीन चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री. संदिप क्षीरसागर
(२) श्री. विजयसिंह पंडित
(३) श्री. सुनिल प्रभू
(४) श्री. अमित देशमुख
(५) श्री. राजेश विटेकर
(६) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे
(७) श्री. सिद्धार्थ खरात (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ३६ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) श्री. राधाकृष्ण विखे पाटील (मंत्री) (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले –

(क) श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल.

(ख) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांचा सन २०२१-२०२२ व २०२२-२०२३ या वर्षांचा अनुक्रमे एकविसावा व बावीसावा वार्षिक अहवाल.

(२) श्री. हसन मुश्रीफ (मंत्री) (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी, महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२४ च्या तिसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक २७ जून, २०२४ ते दिनांक १२ जुलै, २०२४ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ३५३ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२४ चे तिसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २२९ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवले.

**२.** (१) श्री. अभिजीत पाटील, वि.स.स. यांनी, "माढा तालुक्यात उजनी हे १२३ टीएमसी पाणी साठ्याचे सर्वात मोठे धरण असून देखील माढा शहरात ३६५ दिवसांपैकी फक्त ३१ दिवस पिण्यासाठी पाणी आले असणे, उजनी धरणावर पर्यटन स्थळ विकसित करणे तसेच मत्स्यव्यवसाय विकासाच्या दृष्टीने या धरणात मत्स्य बीज सोडण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाच्या जाहिरात क्र. ०४/२०२४ मध्ये दिव्यांगाच्या आरक्षणामध्ये (CP) Two Leg affected दोन पाय बाधित या दिव्यांग प्रकाराचा समावेश नसणे तसेच दिव्यांग उमेदवाराकरता सहानुभूतिपूर्वक विचार करण्यात येऊन एक पाय बाधीत दिव्यांग उमेदवारांचा शासनाच्या सर्व विभागामध्ये तंत्रज्ञ-३ वर्गाच्या पदांकरिता समायोजन करणे आवश्यक असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. दिलीप बोरसे, वि.स.स. यांनी, "केंद्र शासनाने कांदा निर्यातीवर २० टक्के शुल्क आकारण्याबाबत घेतलेला निर्णय मागे घेण्यासाठी राज्य शासनाने शिफारस करावी" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांनी, "पुणे शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न चिंताजनक स्वरूपापर्यंत पोहोचला असल्यामुळे सर्व डी.पी.रोड व मेट्रोच्या मार्गिकेची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. सुधीरदादा ऊर्फ धनजंय गाडगीळ, वि.स.स. यांनी, "सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेची मंजूर फेरबदलांचे (SM) विकास योजनेसंदर्भातील दिनांक ०४/०४/२०१२ व ०३/०३/२०१६ या दोन्ही अधिसूचनेतील निर्णयांचे SM व EP चे दोन्ही नकाशे अद्यापही तयार होऊन प्रसिद्ध झालेले नसणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. राजेश मोरे, वि.स.स. यांनी, "कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील २७ व नवी मुंबई महानगरपालिकेतील १४ गावांमध्ये पाण्याची मोठी समस्या असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. अमोल खताळ, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्रातील अंत्योदय कार्ड व प्राधान्य कार्डधारक लाभार्थींना स्वस्त धान्य दुकानांतून धान्याचे वाटप करतेवळी येणाऱ्या सर्व अडचणी सोडविण्यासाठी शासनाने तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना सूचना कराव्यात व सर्व लाभार्थ्यांना लवकरात लवकर स्वस्त धान्य उपलब्ध करून द्यावे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. राहुल आवाडे, वि.स.स. यांनी, "इचलकरंजी वस्त्रोद्योग नगरी म्हणून ओळखली जात असून तेथील पाण्याचा प्रश्न फार गंभीर होत चालला असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. शिवाजी पाटील, वि.स.स. यांनी, "चंदगड, आजरा, गडहिंग्लज तालुक्यात वारंवार येणाऱ्या पूर परिस्थितीवर शासनाने योग्य उपाययोजना करण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) सना मलिक, वि.स.स. यांचा औचित्याचा मुद्दा.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने हिंदी प्रतिवेदन प्रलंबित.)

श्री.आदित्य ठाकरे, वि.स.स. यांनी, "मुंबईतील सिस्टिमप्रमाणे नागपूर येथील सिस्टिमवर देखील सन्माननीय सदस्यांचे नाव दिसण्यासाठी सदर यंत्रणेत सुधारणा करणे" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

**औचित्याचे मुद्दे – पुढे सुरू**

(११) श्री. शंकर जगताप, वि.स.स. यांनी, "पिंपरी विभागातील सांगवी उप विभागाची पुनर्रचना करून नवीन ४ शाखा कार्यालये व हिंजवडी येथे नवीन उप विभाग कार्यालय निर्माण करण्याचा प्रस्ताव मंजुरीअभावी प्रलंबित असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. राजेश विटेकर, वि.स.स. यांनी, "मानवत तालुक्यातील ४२ व परभणी तालुक्यातील १२ अशा ५४ गावांमधील शेतकऱ्यांना सिंचनाचे पाणी मिळावे यासाठी कालव्यांची दुरुस्ती व पाणी पाळ्यांचे नियोजन करून बागायती क्षेत्र वाढविण्यासाठी शासन स्तरावर निर्णय घेण्याची आवश्यकता, परभणी जिल्ह्यातील प्रत्येक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या उप बाजार समिती क्षेत्रात सीसीआयचे कापूस खरेदी केंद्र सुरु करण्याची आवश्यकता तसेच शासकीय सोयाबीन खरेदीची नोंदणी करण्यासाठी शासनाने दिलेली दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजीपर्यंतची मुदतवाढ उक्त केंद्रावरील शेतकऱ्यांची गर्दी लक्षात घेता दिनांक १५ फेब्रुवारी, २०२५ रोजीपर्यंत देण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री. हेमंत ओगले, वि.स.स. यांनी, "राज्यात सन २०११-२०१२ पासून आजपर्यंत अनेक अंशकालीन शिक्षकांना तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागत असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री. मनोज घोरपडे, वि.स.स. यांनी, "कराड तालुक्यातील तारळी नदीवरील इंदोली व पाल उपसा सिंचन योजना टेस्टींगनंतर १० वर्षापासून सुरू करण्यात आल्या नसणे, कोरेगाव तालुक्यातील पूर्व भागासाठी पाण्याचे नियोजन करणे गरजेचे असणे तसेच केरोली व नडशी येथील रेल्वे बोगद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचत असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री. तुकाराम काते, वि.स.स. यांनी, "मे. नटराज रियल कॉम प्रायव्हेट लिमिटेड यांनी चेंबूर मुंबई येथील सर्वे क्रमांक ८० व सर्वे क्रमांक ८३ हिस्सा क्रमांक ७ बोरला येथील साधारण २ एकर २१ गुंठे जमीन खरेदी करताना सदर जागेचे मूल्यांकन रुपये १ कोटी २० लाख रुपये इतके कमी दाखवून शासनाची दिशाभूल करणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी, "राज्यातील सफाई कामगारांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्यासंबंधीचा अनेक वर्षे प्रलंबित असलेला सफाई कामगारांच्या वारसा हक्काचा प्रश्न मार्गी लावण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्री. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स. यांनी, "धानोरा येथे १३२ के. व्ही. क्षमता असलेल्या स्टेशनच्या कामाचे नवीन कंत्राट देऊन धानोरा येथील १३२ के. व्ही. स्टेशनचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री. विजयसिंह पंडित, वि.स.स. यांनी, "गेवराई येथील पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि कायमस्वरुपी दुष्काळाचे निर्मूलन करण्यासाठी सिंदफणा नदीवरील कोल्हापूरी पद्धतीच्या बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रूपांतर करण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) डॉ. राहुल पाटील, वि.स.स. यांनी, "परभणी शहरातील अमृत पाणी पुरवठा योजना टप्पा-२, परभणी शहरातील भग्नावस्थेत असणाऱ्या सांस्कृतिक वास्तूसाठी १२ कोटी रुपयांचा लागणारा निधी तसेच परभणी शहरातील भुयारी गटार योजना (एसटीपी) हे परभणी महानगरपालिकेचे तीन प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२०) श्री. राजेश बकाने, वि.स.स. यांनी, "देवळी तहसील आणि पुलगाव अपर तहसील येथील दस्त नोंदणी कार्यालय पूर्णवेळ सुरु होण्यासंदर्भात शासनास सूचना करणे तसेच देवळी तालुक्यातील शेतकऱ्यांना जंगली रानडुक्कर व जंगली श्वापदे यांचा सहन करावा लागणारा त्रास आणि शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर शेतीसाठी कुंपण देण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२१) श्री. अनुपभैय्या अग्रवाल, वि.स.स. यांनी, “धुळे शहरात कॉटन मार्केट परिसरमधील जागा शासनाच्या मालकीची असून त्या जागेवर वक्फ बोर्डाने दावा करून ती वक्फ बोर्डाच्या नावे केली असणे तसेच धुळे जिल्ह्यातील ११७ जागांवर वक्फ बोर्डाचे नाव लावण्यात आले असणे” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२२) श्री. राजेश पाडवी, वि.स.स. यांनी, “मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील ३ हजार ५१० प्रशिक्षाणार्थींना सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देण्याची किंवा कंत्राटी पद्धतीने कामाचे आदेश देण्याची आवश्यकता” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२३) श्री. अमित देशमुख, वि.स.स. यांनी, “लातूर शहरात मागील सहा महिन्यामध्ये अनेक हत्या, खून झाले असून त्यांचा तपास अद्यापपर्यंत लागला नसल्यामुळे सदर प्रकरणात सरकारी वकीलांची नेमणूक करणे व लातूर येथे जलदगती न्यायालय स्थापन करून त्या माध्यमातून हा खटला चालवण्याची आवश्यकता” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२४) श्री. महेश (दादा) लांडगे, वि.स.स. यांनी, “पिंपरी-चिंचवड शहरात फार मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झालेला असणे तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये अँटी रेबिज लस आणि रेबिज अँटी सिरमच्या उपलब्धता व उपयोगितेची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचणे अत्यंत गरजेचे असणे” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२५) श्री. वरुण सरदेसाई, वि.स.स. यांनी, “वांद्रे-पूर्व येथील सन २०१९ साली धोकादायक असल्याचे कारण देऊन पाडण्यात आलेला स्काय वॉक एमएमआरडीए किंवा महानगरपालिकेमार्फत पुन्हा एकदा अद्ययावत बांधण्याची आवश्यकता” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२६) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, “शासनाने केंद्र पुरस्कृत व राज्य शासनाच्या घरकूल योजनेच्या अनुदानात भरीव वाढ करण्याची आवश्यकता” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२७) श्रीमती विद्या ठाकूर, वि.स.स. यांनी, “मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाच्या उत्तर भागातील पॅकेज बी मधील बागुलनगर ते माईंड स्पेस मालाड इंटरचेंज आणि मुलुंड लिंक रोडच्या विस्तारीकरणामुळे स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान बाधित होत असणे” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२८) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी, “पनवेल महानगरपालिका हद्दीत ठिकठिकाणी कोणत्याही अधिकृत परवानग्या न घेता काही लोकांच्या दादागिरीने अवैधपणे आठवडी बाजार मोठ्या प्रमाणात सुरू असणे” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२९) श्री. मुरजी पटेल, वि.स.स. यांनी, "मुंबई महापालिकेकडून काढण्यात आलेल्या लॉटरीमधील पात्र महिला लाभार्थ्यांना शिलाई मशिन, घरघंटी मसाला बनविण्याचे मशिन संबंधित साहित्याचे वाटप करण्यासंबंधी शासनाने महापालिकेला आदेश द्यावेत, अंधेरी पूर्व भागात वाहतुकीची समस्या मोठ्या प्रमाणावर असणे तसेच अंधेरी पूर्व भागात एकही शासकीय रुग्णालय नसणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३०) अबु आझमी, वि.स.स. यांचा औचित्याचा मुद्दा.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने
हिंदी भाषेतील प्रतिवेदन प्रलंबित आहे.)

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांनी खुलासा केला.

हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतची वस्तुस्थितीसंदर्भातील माहिती सभागृहाला अवगत करावी असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

(३१) अमिन पटेल, वि.स.स. यांचा औचित्याचा मुद्दा.

(प्रतिवेदन कक्षातील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने
हिंदी भाषेतील प्रतिवेदन प्रलंबित आहे.)

(३२) श्री. सुमित वानखेडे, वि.स.स. यांनी, "आर्वी मतदार क्षेत्रामधील एकूण १६ सब-स्टेशनच्या सौर ऊर्जेच्या कामासंदर्भात मागील ८ महिन्यांपासून कार्यवाही करण्यात आलेली नसणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३३) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी, "गेटवे ऑफ इंडिया येथून एलिफंटा बेटाकडे जाणाऱ्या नीलकमल प्रवासी बोटीला नौदलाच्या बोटीने धडक दिल्यामुळे घडलेल्या दुर्घटनेच्या अनुषंगाने खाजगी व नौदलाच्या सर्व बोटींची चौकशी करण्यात येऊन त्या बोटींना एक रूट ठरवून देण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, "सभागृहाच्या आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये स्थगन प्रस्तावाच्या सूचनांचा उल्लेख करण्यात आला नसणे" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी आपले मत मांडले.

जेव्हा सभागृहामध्ये वित्तीय कामकाज होणार असते त्यावेळी स्थगन प्रस्तावाच्या सूचना विचारात घेतल्या जात नाहीत. आज पुरवणी मागण्या असल्यामुळे आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये स्थगन प्रस्तावाच्या सूचनांचा उल्लेख करण्यात आलेला नाही असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**औचित्याचे मुद्दे – पुढे सुरू**

(३४) श्री. प्रविण दटके, वि.स.स. यांनी, "नागपूर येथे बी.एस.सी.मध्ये शिक्षण घेत असलेल्या एका तरुणीला लव्ह जिहादच्या माध्यमातून फसवले गेले असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

**म.वि.स. नियम ९७ अन्वये स्थगन प्रस्तावाच्या सूचनेबाबत –**

श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांनी, "गेटवे ऑफ इंडिया येथून एलिफंटा बेटाकडे जाणाऱ्या नीलकमल प्रवासी बोटीला नौदलाच्या बोटीने धडक दिल्यामुळे झालेल्या दुर्घटनेमध्ये १३ लोक मृत्युमुखी पडणे याबाबत माननीय मुख्यमंत्री यांनी निवेदन केले असून या विषयावर बोलण्याकरिता वेळ देण्यात यावा" असा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. भास्कर जाधव व श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी आपले मत मांडले.

आज ही चर्चा न घेता शासनाने आजचे कामकाज संपण्यापूर्वी सविस्तर सर्व माहिती निवेदनाच्या माध्यमातून सभागृहासमोर मांडावी व त्यानंतर आपण या विषयावर सखोल चर्चा घेण्याबाबतचा निर्णय घेऊ असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सर्वश्री नाना पटोले व इतर वि.स.स. यांनी, "परभणी व बीड येथे घडलेल्या गंभीर घटनांची चौकशी करून कारवाई व उपाययोजना करणे" या विषयावर उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा – (चर्चा पुढे सुरू)

उपरोक्त अल्पकालीन चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(७) श्री. सिद्धार्थ खरात (८) श्री. नाना पटोले

(९) डॉ. ज्योती गायकवाड (१०) श्री. बाबुराव कदम-कोहळीकर

(११) श्री. संजय मेश्राम (१२) श्री. रोहित पवार

(चर्चेवरील मंत्र्यांचे उत्तर - अपूर्ण)

उपरोक्त म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चा आता संपली आहे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी घोषित केले.

माननीय मुख्यमंत्री सदर अल्पकालीन चर्चेवरील उत्तर देतील असे श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांनी सांगितले.

श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांनी, “पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती विधानसभा नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी” इ. बाबत म.वि.स. नियम ५७ अन्वये सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

**सन २०२४-२०२५ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान – (पहिला दिवस)**

(१) कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग

(३) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

(१) कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागण्या म्हणजे अनुक्रमांक १४ ते १७, (२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या म्हणजे अनुक्रमांक २८ ते ३४ आणि (३) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या मागण्या म्हणजे अनुक्रमांक ३९ ते ४४ चर्चेला घेण्यात येतील तसेच या मागण्यांचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरित केला आहे असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्यांवरील एकत्रित चर्चेची कार्यपद्धती माननीय तालिका सभाध्यक्षांनी विशद केली व विभागांच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी सन्माननीय सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सन्माननीय सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै, २०१० पासून मान्य झाली असल्यामुळे, आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे गृहीत धरून चर्चेला सुरूवात होईल असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त मागण्या प्रस्तुत झाल्या.

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री. नाना पटोले (२) डॉ. आशिषराव देशमुख

(चर्चा अपूर्ण)

**माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा – (मुख्यमंत्र्यांचे उत्तर) - चर्चा पुढे सुरू**

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेस मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**सन २०२४-२०२५ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान – चर्चा पुढे सुरू**

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(३) श्री. भास्कर जाधव (४) श्री. बाबुराव कदम-कोहळीकर (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

श्री. अमित देशमुख, वि.स.स. यांनी, "लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्त भागातील औसा तालुक्यातील शास्तूर परिसरात भूगर्भातून मोठा आवाज आल्याची माहिती प्राप्त झाली असणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची नोंद घ्यावी असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**सन २०२४-२०२५ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान – (चर्चा पुढे सुरू)**

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(५) श्रीमती सरोज अहिरे (६) श्री. सुमित वानखेडे

(७) श्री. आदित्य ठाकरे (८) श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव

(९) श्री. शेखर निकम (१०) श्री. जयंत पाटील

(११) श्रीमती अनुराधा चव्हाण (१२) श्री. रत्नाकर गुट्टे

(१३) श्री. सुनिल शेळके (१४) अबु आझमी

(१५) श्रीमती सीमा हिरे (१६) श्री. आशुतोष काळे

(१७) श्री. अमित देशमुख (१८) श्री. गोपिचंद पडळकर

(१९) श्री. रमेश बोरनारे (२०) श्री. दिलीप सोपल

(२१) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे (२२) श्री. अमित झनक

(२३) श्री. बाबाजी काळे

(२४) श्री. कैलास घाडगे पाटील

(२५) श्री. शरददादा सोनवणे

(२६) डॉ. बाबासाहेब देशमुख

(२७) श्री. संजय पुराम

(चर्चा अपूर्ण)

श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांनी सभागृहाच्या अनुमतीने पुढील म.वि.स. नियम ११० अन्वये शासकीय ठराव मांडला—

"ज्याअर्थी, नागरी विमान चालन संचालक, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी वायुयान अधिनियम, १९३४ (१९३४ चा २२) याची कलमे ५ व ७ आणि ८ चे पोट-कलम (२) यांअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून करण्यात आलेले वायुयान नियम, १९३७ याच्या भाग अकरा मध्ये अंतर्भूत असलेल्या नियमांस अनुसरुन महाराष्ट्रात "लोहगाव विमानतळ, पुणे" याकरिता भारतीय विमानतळ प्राधिकरणास "विमानतळ लायसन्स संरक्षण आणि सार्वजनिक वापरार्थ" दिले आहे;

आणि ज्याअर्थी, लोहगाव विमानतळ, पुणे येथील उक्त विमानतळाचे, "जगद्गुरू संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुणे" असे पुनर्नामकरण करणे आणि त्या प्रयोजनासाठी, असा प्रस्ताव नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे पाठविण्यापूर्वी, त्यास राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळविल्यानंतर, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार यांची मान्यता मिळविणे इष्ट वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र विधानसभा नियम याच्या नियम ११० अनुसार, महाराष्ट्र विधानसभा, याद्वारे, लोहगाव विमानतळ, पुणे येथील उक्त विमानतळाचे "जगद्गुरू संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुणे" असे पुनर्नामकरण करण्याची शिफारस केंद्र शासनाला करीत आहे."

ठराव प्रस्तुत झाला.

लोहगाव विमानतळ, पुणे येथील विमानतळाचे "जगद्गुरू संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुणे" असे पुनर्नामकरण करणे, या संबंधी राज्य विधिमंडळाची शिफारस केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल असे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

ठराव मतास टाकून एकमताने संमत झाला.

**शासकीय विधेयक –**

**विचार खंडशः विचार व संमत करणे -**

(१) श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ —महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२४ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानसभेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली असल्याचे सांगितले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत करण्यात आले.

**सन २०२४-२०२५ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान – (चर्चा पुढे सुरू)**

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(२८) श्री. अमोल पाटील
(२९) श्री. ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके
(३०) श्री. बापूसाहेब पठारे
(३१) श्री. सिद्धार्थ शिरोळे
(३२) श्री. शिवाजी पाटील
(३३) श्री. राजू तोडसाम
(३४) श्री. हेमंत रासने
(३५) श्री. सुहास बाबर
(३६) श्री. अभिजीत पाटील
(३७) श्री. शंकर जगताप
(३८) श्रीमती श्रीजया चव्हाण
(३९) श्री. हिरामण खोसकर
(४०) श्री. संजय मेश्राम
(४१) श्रीमती स्नेहा दुबे-पंडित
(४२) श्री. आनंद तिडके
(४३) श्री. राहुल पाटील
(४४) श्री. रईस शेख
(४५) श्रीमती मोनिका राजळे

(४६) श्री. हेमंत ओगले (४७) श्री. शंकर मांडेकर

(४८) श्री. सुरेश धस (४९) श्री. संजय गायकवाड

(५०) श्री. काशिनाथ दाते (५१) श्री. अनंत (बाळा) नर (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांनी, "गेट वे ऑफ इंडियाजवळ समुद्रात बोटीचा अपघात होणे" इ.बाबत माननीय अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार सभागृहाच्या अनुमतीने म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**सन २०२४-२०२५ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान – (चर्चा पुढे सुरू)**

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेस श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांनी उत्तर दिले.

आता कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागण्या अनुक्रमांक १४ ते १७, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागण्या अनुक्रमांक २८ ते ३४ व उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या मागण्या अनुक्रमांक ३९ ते ४४ आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेसोबतच्या सूचीत दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

सभागृहाची बैठक रात्रौ ८ वाजून ३४ मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

**शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०२४**

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभा सभागृहात सकाळी ११-०० वाजता माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१. श्री. गिरीश महाजन, मंत्री यांनी मुख्यमंत्र्यांकरिता पुढील कागदपत्रे सभागृहासमोर ठेवली—

(क) मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली, ता. पनवेल यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा बत्तीसावा वार्षिक अहवाल,

(ख) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(ग) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचे सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल,

(घ) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक वित्तीय अहवाल,

(ड.) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ चा स्वतंत्र लेखापरीक्षा व त्यावरील अनुपालन अहवाल,

(च) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा सव्वीसावा वार्षिक वित्तीय अहवाल,

(छ) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन २०२०-२०२१, सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ करीताचा अलग लेखा अहवाल,

(ज) कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल,

(झ) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(त्र) मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(ट) नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा सातवा वार्षिक अहवाल,

(ठ) हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांचे जन्मस्थळ असलेल्या खेड येथील वाडयाचे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे," या विषयावरील श्री.दिलीप मोहिते-पाटील व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी म.वि.स. नियम १०५ अन्वये झालेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार हुतात्मा शिवराम हरी राजगुरु जन्मस्थळ परिसर विकास आराखड्यासंदर्भातील प्रगती अहवाल तसेच

(ड) लोकलेखा समितीच्या सन २००१-२००२ च्या आठव्या अहवालातील परिच्छेद १.२८ नुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी केलेल्या सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षातील पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र.

आज शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण ३ सूचना प्राप्त झालेल्या असून आज सन २०२४-२०२५ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान व चर्चारोध असल्यामुळे महाराष्ट्र विधानसभा नियम २६० (५) अन्वये स्थगन प्रस्तावाच्या सूचना घेता येणार नाहीत. त्यामुळे या सर्व सूचनांना दालनातच अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहात गोंधळसदृश वातावरण निर्माण झाल्यामुळे सभागृहाची बैठक
१० मिनिटांसाठी स्थगित करित असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून १४ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची सकळी ११ वाजून २४ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(१) डॉ. ज्योती गायकवाड, वि.स.स. यांनी, "धारावीतील क्रीडा संकुलामधील क्रीडा प्रकारांचे दर वाढल्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील क्रीडापटूंना दर्जेदार प्रशिक्षणापासून वंचित रहावे लागणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी, "कल्याण येथील योगीधाम सोसायटीमध्ये मराठी कुटुंबाला झालेली मारहाण," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

या प्रकरणात संबंधितांवर कारवाई करणयाचे आदेश तातडीने दिले जातील, असे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी सांगितले.

**औचित्याचे मुद्दे - (पुढे सुरू)**

(२) श्री. बाबाजी काळे, वि.स.स. यांनी, "पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील पुनर्वसनाचे अनेक प्रश्न मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय अध्यक्षांनी पुढील दोन घोषणा केल्या -

(१) पहिल्यांदा निवडून आलेल्या सदस्यांना प्राधान्याने बोलण्याची संधी देण्यात येईल तसेच

(२) १५ व्या विधानसभेमध्ये ७८ सदस्य पहिल्यांदाच निवडून आलेले आहेत. त्यासाठी या सन्माननीय सदस्यांसाठी जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात मुंबई येथे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित केले जाईल, अशी घोषणा माननीय अध्यक्षांनी केली.

**अल्पकालीन चर्चा – (म.वि.स. नियम १०१ अन्वये) – (चर्चा पुढे सूरू)**

सर्वश्री. नाना पटोले व इतर वि.स.स. यांनी, “परभणी व बीड येथे घडलेल्या गंभीर घटनांची चौकशी करून कारवाई व उपाययोजना करणे” या विषयावर उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेला मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. -

अल्पकालीन चर्चा संपली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**औचित्याचे मुद्दे – (पुढे सुरू)**

(३) श्री. महेश सावंत, वि.स.स. यांनी, “झोपडपट्टी पुनर्विकास अंतर्गत अनेक प्रकल्प अपूर्ण असून त्यांच्या पूर्ततेकरिता शासनाने विशिष्ट अधिकाऱ्याची नियुक्ती करून या प्रकरणांमध्ये तातडीने तोडगा काढणे आणि प्रकल्पबाधितांना घरे देण्याची आवश्यकता,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. महेश शिंदे, वि.स.स. यांनी, “खेड येथे रस्त्याच्या कामाच्या वादातून अनेक लोकांना पोलिसांनी तुरुंगात टाकणे, या प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. शंकर मांडेकर, वि.स.स. यांनी, “भोर, राजगड, मुळशी, उतरोळी आणि वडगाव या गावांत एमआयडीसीचा प्रश्न मार्गी लावण्याची तसेच, मान-हिंजवडी एमआयडीसीतील प्रकल्प पूर्ण करणे तसेच ग्रामीण भागात एसटीची सेवा नियमित करण्याची आवश्यकता,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. उमेश ऊर्फ चंदू यावलकर, वि.स.स. यांनी, “अमरावती जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात संत्रा बाग असल्यामुळे अमरावती व मोर्शी येथे प्रक्रिया उद्योग सुरू करणे, तसेच मोर्शी येथील रखडलेले जैन इरिगेशन आणि कोका कोला हे प्रकल्प तातडीने सुरू करण्याची आवश्यकता,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. श्याम खोडे, वि.स.स. यांनी, “राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील गट क व गट ड कर्मचाऱ्यांनाही एक स्तर वेतनश्रेणी लागू करण्याची आवश्यकता,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. वरुण सरदेसाई, वि.स.स. यांनी, “वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहतीमधील वर्ग दोन व तीन अधिकाऱ्यांना त्याच भागातील रिक्त २१० सदनिकांमध्ये स्थलांतरित करण्याची आवश्यकता,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. अनिल ऊर्फ बाळसाहेब मांगुळकर, वि.स.स. यांनी, "मतदारसंघातील सन २०२३-२०२४ या वर्षाच्या प्रधानमंत्री पीक विम्याचे पैसे अद्याप मिळालेली नसल्याने संबंधित शेतकऱ्यांची यादी कृषी विभागाला उपलब्ध करून देणे तसेच ३०२ कोटी रुपयांची अमृत पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याची गरज," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री. रोहित पवार, वि.स.स. यांनी, "कर्जत-जामखेड येथील ज्ञानराधा मल्टिस्टेट को.ऑप सोसायटीद्वारे ठेवीदारांची झालेली फसवणूक, तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या आयुष्याचे चित्रण करणारे संग्रहालय चौंडी येथे बांधण्यासाठी अधिकचा निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री. मिहिर कोटेचा, वि.स.स. यांनी, "भायखळा येथे उभे केलेले लर्निंग सेंटर रद्द करून तेथे स्थानिक युवकांसाठी कौशल्य विकास केंद्र उभारण्याची आवश्यकता," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स. यांनी, "गोसीखुर्द प्रकल्पामुळे बाधित झालेल्या गावातील तरुणांना शासकीय नोकरीत लाभ देण्याची आवश्यकता," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री. मनोज कायंदे, वि.स.स. यांनी, "सिंदखेडराजा या भागात मानव विकास अंतर्गत नवीन ५० बसेस उपलब्ध करून देण्याची तसेच देऊळगाव राजा व सिंदखेड राजा येथे बस आगार निर्माण करण्याच्या शासनाकडे दाखल प्रस्तावाला तातडीने मंजुरी मिळण्याची आवश्यकता," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१४) श्री. चरणसिंग ठाकूर, वि.स.स. यांनी, "काटोल व नरखेड एमआयडीसीतील सोलर प्लॉट तातडीने हटविणे तसेच सरकारने शेतकऱ्यांना रोही व डुकरे मारण्याची परवानगी देण्याची किंवा कृषी पंपांप्रमाणे सौर ऊर्जेवर आधारित सौर कुंपण योजना आणण्याची आवश्यकता," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१५) श्री. तान्हाजी मुटकुळे, वि.स.स. यांनी, "हिंगोली शहराच्या मध्यभागी असलेल्या जलेश्वर तलावाच्या सुशोभीकरणासाठी हटविण्यात आलेल्या लोकांना म्हाडा किंवा अन्य योजनांच्या अंतर्गत जमीन प्रदान करून घरे बांधून देण्याची आवश्यकता," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१६) श्रीमती रंजनाताई जाधव, वि.स.स. यांनी, "कन्नड-चाळीसगाव घाटामध्ये केवळ हलक्या वाहनांनाच प्रवेश असल्यामुळे जड वाहनांना मोठा फेरा मारावा लागणे, त्यासाठी या मार्गावर बोगदा तयार करण्याची किंवा विद्यमान मार्गाचे विस्तारिकरण करण्याची आवशय्कता," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. यांनी, "गडचांदूर तसेच कोरपणा येथे बस स्थानक होण्याची तसेच गोंडपिंपरी तालुक्यातील एमआयडीसीमध्ये नवीन उद्योग स्थापन करण्याची तसेच जिवती येथील कापूस खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्याची आवश्यकता," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१८) श्री. नारायण कुचे, वि.स.स. यांनी, "बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑप सोसायटीत झालेला साडे तीन हजार कोटी रुपयांचा घोटाळा, तसेच जालना जिल्ह्यातील विमाधारक शेतकऱ्यांना सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४ या वर्षाकरिता नुकसान भरपाई न मिळणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१९) श्री. राहुल कुल, वि.स.स. यांनी, "अवयवदानाची प्रक्रिया सुटसुटीत करण्याची, तसेच दुधाला दिले जाणारे ७ रुपयांचे अनुदान १० रुपये करण्याची आवश्यकता," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२०) श्री. विठ्ठल लंघे, वि.स.स. यांनी, "नेवासा येथील पवित्र पैस खांबाच्या मंदिराच्या विकासाकरिता आराखड्यानुसार शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून शनेश्वर देवस्थानातील अनियमिततेची चौकशी करण्याची आवश्यकता," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२१) श्री. बबनराव यादव, वि.स.स. यांनी, "परतूर, मंठा तसेच वाटूर येथे उप जिल्हा रुग्णालयासाठी मंजूर ७ कोटी रुपये तातडीने उपलब्ध करून देणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२२) श्री. संजय दरेकर, वि.स.स. यांनी, "मौजा शिंदोला, ता. वणी, जि. यवतमाळ येथील ग्रामस्थांच्या ताब्यात असलेल्या विवादित शेतजमिनीचे मालक घोषित करणे आणि शासन स्तरावर कायद्यात आवश्यक त्या दुरुस्ती करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२३) डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स. यांनी, "सोलापूर जिल्ह्यातील सांगोल तालुक्यातील अवैध वाळू उत्खनन तसेच अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, तसेच विद्यार्थ्यांकरिता विशेष बससेवा सुरू करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२४) श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी, "मुंबई शहरामध्ये अंमली पदार्थ विक्रेत्यांविरोधात कडक कारवाई करणे, तसेच संजय नगर बीट व घाटकोपर पोलीस स्टेशन परिसरामध्ये सुरू असलेल्या गुटखा विक्रीवर कारवाई करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२५) श्री. साजिद पठाण, वि.स.स. यांच्या औचित्याच्या मुद्यातील हिंदीमधील मजकूर हिंदी प्रतिवेदकांच्या रिक्त पदांमुळे उपलब्ध नाही.

( २६ ) श्रीमती स्नेहा दुबे पंडित, वि.स.स. यांनी, “वसईतील वीज पुरवठा करणाऱ्या ओव्हरहेड वाहिन्या भूमिगत करण्याच्या प्रस्तावाला तातडीने मंजुरी देणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २७ ) कुमारी श्रीजया चव्हाण, वि.स.स. यांनी, “भोकर मतदारसंघातील मुदखेड, अर्धापूर आणि भोकर तालुक्यांतील जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर कामांना प्रशासकीय मान्यता देणे तसेच सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन या कामांकरिता निधी उपलब्ध करून देणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २८ ) श्री. राहुल आवाडे, वि.स.स. यांनी, “इचलकरंजी येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( २९ ) श्री. जितेश अंतापूरकर, वि.स.स. यांनी, “देगलूर शहरातील वक्फ बोर्डाने दवा दाखल केलेल्या ३८ गटांमधील ४२१ एकर जमिनीची मालकी हक्क नोंदणी तात्काळ प्रभावाने रद्द करून पूर्ववत नोंदी कायम करणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( ३० ) डॉ. अशोकराव माने, वि.स.स. यांनी, “हातकणंगले मतदारसंघातील काही गावांमधील घरांमध्ये पुराचे पाणी गेल्यामुळे स्थलांतरित करणे मात्र त्यांना अद्याप अनुदान प्राप्त न होणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( ३१ ) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांनी, “नागपूर सुधार प्रन्यासने सन १९९६ मध्ये आरक्षित केलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्कसाठीच्या भूखंडाचे भूसंपादन करून सदर पार्क विकसित करणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( ३२ ) श्री. अशोक पाटील, वि.स.स. यांनी, “उंटबर ग्रामपंचायत, दापोली तालुक्यातील देवस्थान इनाम असलेली जागा विविध लोकांच्या नावे करणाऱ्या अधिकाऱ्याची चौकशी करणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

( ३३ ) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांनी, “गुहागर येथील खरे-ढेरे-भोसले महाविद्यालयाच्या तीन प्राध्यापकांना संस्थाचालकांनीच गंभीर मारहाण करणे,” इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने सदर बाबतीत नोंद घ्यावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

( ३४ ) श्री. रईस शेख, वि.स.स. यांचा हिंदीमधील मजकूर हिंदी प्रतिवेदकांच्या रिक्त पदांमुळे उपलब्ध नाही.

(३५) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स. यांनी, "लातूर जिल्ह्यात मागील २ वर्षांपासून पाणी टंचाई निवारणासाठी शेतकऱ्यांच्या खाजगी व विंधन विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून त्यांची देयके निधीअभावी जिल्हा परिषदेकडे प्रलंबित असणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३६) श्री. शेखर निकम, वि.स.स. यांनी, "चिपळूण येथील मध्यवर्ती बस स्थानकाचे अपूर्ण असलेले नूतनीकरणाचे काम, तसेच चिपळूण, संगमेश्वर आणि देवरूख आगारांस अधिक बसेस उपलब्ध करून देण," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३७) श्रीमती सना मलिक, वि.स.स. यांनी, "मुंबईतील एसपीपीएन मानखुर्द आणि एस.जी. केमिकल, विष्णू नगर येथील प्रकल्प बाधितांकरिता असलेल्या वसाहतीमध्ये झालेली घुसखोरी, संबंधित दोषींवर कारवाई करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३८) श्री. प्रवीण स्वामी, वि.स.स. यांनी, "राज्यातील ऊस वाहतूक करणाऱ्या सर्वच वाहनांवर रेडियम रिफ्लेक्टर लावण्याची सक्ती करणे, तसेच उमरगा, लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीचे अनुदान तात्काळ मंजूर करणे तसेच महाज्योती अंतर्गत पीएचडी करणाऱ्या पात्र संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप देणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

**२. सन २०२४-२५ या वर्षाच्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)—**

नगर विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्र. एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, आर-१ चर्चेसाठी सभागृहाला सादर करण्यात आल्या.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी, अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व या मागण्यांवर कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे गृहीत धरून आता चर्चेला प्रारंभ होईल, असे सांगितले.

अनुदानावरील मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुनील प्रभु
(२) श्री. चरणसिंग ठाकूर
(३) श्री. संजय गायकवाड
(४) श्रीमती सना मलिक
(५) श्री. अमिन पटेल
(६) श्री. रोहित पवार
(७) श्री. अजय चौधरी
(८) श्री. उमेश ऊर्फ चंदू यावलकर
(९) श्री. विठ्ठल लंघे
(१०) श्री. राजेश विटेकर

(११) श्री. अमित देशमुख
(१२) डॉ. बाबासाहेब देशमुख
(१३) श्री. कैलास घाडगे पाटील
(१४) श्री. जितेश अंतापूरकर
(१५) श्री. दिलीप लांडे
(१६) श्री. संजय मेश्राम
(१७) डॉ. किरण लहामटे
(१८) श्री. अभिजित पाटील
(१९) श्री. अबु आझमी
(२०) श्री. आदित्य ठाकरे
(२१) श्रीमती मनिषा चौधरी
(२२) श्री. आमश्या पाडवी
(२३) श्री. हेमंत ओगले
(२४) श्री. संजय केळकर
(२५) श्री. मुरजी पटेल
(२६) श्री. राजेश बकाने
(२७) डॉ. राहुल पाटील
(२८) श्री. शेखर निकम
(२९) श्रीमती मंजुळा गावित
(३०) श्री. विक्रम पाचपुते
(३१) श्री. रामदास मसराम

(चर्चा अपूर्ण)

श्री. बापूसाहेब पठारे, वि.स.स. यांनी, "मानगाव येथे झालेल्या वऱ्हाडी बसच्या अपघाताप्रकरणी उचित उपाययोजना करणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी, असे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

**सन २०२४-२५ या वर्षाच्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) - (पुढे सुरू)**

अनुदानावरील मागण्यांवरील चर्चा पुढे सुरू झाली व चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(३२) श्री. महेश लांडगे
(३३) श्री. बाबाजी काळे
(३४) श्रीमती स्नेहा दुबे-पंडित
(३५) श्री. प्रवीण तायडे
(३६) श्री. महेश सावंत

अनुदानाकरिता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

(चर्चारोधानंतर)

**अनुदानाकरिता पुरवणी मागण्या –**

चर्चारोधीनंतर सन २०२४-२५ च्या अुदानाकरिता पुरवणी मागण्या म्हणजे सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, महसूल व वन विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, वित्त विभाग, जलसंपदा विभाग, विधि व न्याय विभाग, ग्रामविकास विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, नियोजन विभाग, गृहनिर्माण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, आदिवासी विकास विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मृत व जलसंधारण विभाग व दिव्यांग कल्याण विभागाच्या मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

**३. (अ) पुरस्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे —**

श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री यांनी, सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ — महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४ सभागृहाच्या अनुमतीने पुरस्थापित केले.

श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री यांनी उक्त विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्याचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकास सुधाणा देणाऱ्या मा. सदस्यांनी त्या मांडाव्यात असे
मा. तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी विधेयकाला पुढील सुधारणा मांडली व भाषण केले.

**गृह विभाग,**

**पूरक मागणी क्रमांक – बी–१०**

**मुख्य लेखाशीर्ष – ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च**

**बाब क्र. – २३**

**मागणी रुपये – ३,५६,९८,०००/-**

**जलसंपदा विभाग,**

**पूरक मागणी क्रमांक - आय-५**

**मुख्य लेखाशीर्ष - ४७०२, लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च**

**बाब क्र. - १२६**

**मागणी रुपये - ३२,०००/-**

विधेयकातील सुधारणा मागे घेण्याची विनंती मा. उपमुख्यमंत्र्यांनी केली.

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी, सभागृहाच्या अनुमतीने विधेयकातील सुधारणा मागे घेत असल्याचे सांगितले.

विधेयक विचारात घेण्याचा प्रश्न मतास टाकून समंत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर विधेयक संमत झाले.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे—**

(१) मुख्यमंत्र्यांनी, सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ३४—महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२४ मांडले व ते विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

विधेयक विचारात घेण्याबाबतच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. संजय कुटे
(२) श्री. भास्कर जाधव
(३) श्री. बापूसाहेब पठारे
(४) श्रीमती सना मलिक
(५) श्री. आदित्य ठाकरे
(६) श्री. अतुल भातखळकर

मुख्यमंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर विधेयक संमत झाले.

(२) सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ३३—महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४

मुख्यमंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला.

"सन २०२४ चे वि.स.वि. क्र. ३३ - व्यक्ती आणि संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना अधिक प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधी किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**४. सर्वश्री. भास्कर जाधव व इतर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव.**

श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

"राज्याच्या आदिवासी भागातील माता व बालकांचे मृत्यू कमी व्हावेत या उद्देशाने आदिवासी भागात फिरत्या वैदयकिय पथकांव्दारे नवसंजीवनी योजना राबविण्यात येणे, तरी देखील राज्यात आदिवासी माता व बालमृत्यूचे वाढते प्रमाण, या वाढत्या माता बालमृत्यूच्या प्रमाणाची आरोग्य व आदिवासी विभागाने घ्यावयाची गंभीर दखल, शासकीय रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर व नर्ससेची असलेली कमतरता, ग्रामीण भागात एमबीबीएस डॉक्टर मिळत नसल्याने पर्यायी व्यवस्था करणे, राज्यात मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्ल्यू इत्यादी रोगांच्या साथी आटोक्यात आणण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना, मुंबईतील वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहतीतील रहिवाश्यांना माहे मे, २०२५ अखेरपर्यंत राहती निवासस्थाने रिक्त करण्याबाबत दिलेल्या नोटीसा, मार्च-एप्रिल-मे, महिन्यात शालेय व महाविद्यालयीन परिक्षांचा कालावधी असल्याने निवासस्थाने रिक्त करणे अशक्य असणे, याकरिता निवासस्थाने रिक्त करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी, राज्यातील पाणीपुरवठा कार्यक्रमाचा नियोजनबद्धरितीने विकास व अंमलबजावणी करण्यासाठी स्थापन केलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सिंगापूर व मलेशियातील अग्रेसर संस्थांशी करार करण्यात येणे, या कराराअंतर्गत राज्यात घेण्यात आलेल्या योजना, राज्यामध्ये ड्रग्ज आणि अंमलीपदार्थाचे सेवन करण्याचे प्रमाण विशेषतः तरुणांमध्ये वाढत असणे, राज्यात महिलांवरील अत्याचार, लहान मुलांचे अपहरण, हत्या, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान इत्यादी गुन्ह्यांचे देखील प्रमाण वाढते असणे, विदर्भ-मराठवाडा-खानदेश व पश्चिम महाराष्ट्रातील सोयाबीन, धान, संत्रा, तूर, कापूस इत्यादी हमी भावापेक्षा कमी भावात खरेदी करण्यात येणे, खरेदी केंद्रे उशिरा सुरु झाल्याने शेतकऱ्यांना आपला माल खाजगी व्यापाऱ्यांना कमी दरात विकावा लागणे, नाशिक, जळगांव भागात द्राक्ष आणि कोकणामध्ये आंबे,

काजू आणि विदर्भात संत्रा व धान इत्यादी पिकांचे अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान, राज्यातील मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्याचे इतर राज्यात स्थलांतर होत असणे, मुंबईतील बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जमिनीवरील २५ हजार झोपडयांचे आरे कॉलनीच्या ९० एकर जमिनीवर पुनर्वसन करून त्यांना नागरी सुखसोयी पुरविण्याचे म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी दिलेले अंडरटेकिंग, सदर पुनर्वसनासाठी बांधावयाच्या घरांची निविदा प्रक्रिया दिनांक १ डिसेंबर, २०२४ रोजी सुरु होईल असे सांगूनही अद्यापपर्यंत कोणतीही निविदा काढण्यात आली नाही. सदर जमीन महसूल विभागाची असल्याने सदर जमीन महसूल विभागाकडून म्हाडाकडे वर्ग करण्यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता, ठाणे महानगरपालिकेचा शहरावर अन्याय करणारा नवीन डीपी, टोरंट कंपनीची भरमसाठ वीज बिले, ठाणे शहरातील कचऱ्यासाठी डंपिंग ग्राऊंडचा आणि पाण्याचा प्रश्न तीव्र असणे, नवीन डंपिंग ग्राऊंड करण्याची व रहिवाश्यांना पुरेसा पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. मिहिर कोटेचा (२) श्री. मंगेश कुडाळकर

(३) डॉ. किरण लहामटे (४) श्री. रोहित पवार

(५) श्री. कैलास घाडगे-पाटील (६) डॉ. बाबासाहेब देशमुख

(चर्चा अपूर्ण)

तालिका सभाध्यक्षांनी औचित्याच्या मुद्यासंदर्भात पुढील घोषणा केली.

"शनिवार दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजी विधानसभा सभागृहाच्या विशेष बैठकीत औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील. या सचिवालयाकडून निर्गमित केलेल्या दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रक भाग-२ मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार शनिवार दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजीकरिता नव्याने औचित्याचे मुद्दे संगणकीय प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येणार नाहीत. दिनांक १७ ते दिनांक २० डिसेंबर, २०२४ या कालावधीत ज्या सन्माननीय सदस्यांनी औचित्याचे मुद्दे संगणकीय प्रणालीद्वारे सादर केलेले आहेत, परंतु बॅलटमध्ये न आल्यामुळे औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी न मिळालेल्या सन्माननीय सदस्यांना औचित्याचे मुद्दे मांडण्याची संधी सभागृहाच्या उक्त विशेष बैठकीत देण्यात येईल."

**म.वि.स. नियम २९२ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव—(पुढे सुरू)**

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(७) श्री. अमिन पटेल
(८) श्री. प्रताप अडसड
(९) श्री. दिलीप लांडे
(१०) श्री. हिरामण खोसकर
(११) श्री. हारून खान
(१२) श्री. रोहित आर.आर. आबा पाटील
(१३) श्री. शरद सोनवणे
(१४) श्री. हेमंत ओगले
(१५) श्री. सुमित वानखेडे
(१६) श्री. बाबुराव कदम कोहळीकर
(१७) श्रीमती सना मलिक
(१८) श्री. बाबाजी काळे
(१९) श्री. प्रवीण दटके
(२०) श्री.अभिजित पाटील
(२१) श्री. साजिद पठाण
(२२) श्री. राजेश मोरे
(२३) श्री. गजानन लवटे
(२४) श्री. अनंत नर
(२५) श्री. महेश सावंत
(२६) श्री. प्रवीण स्वामी
(२७) श्री. चरणसिंग ठाकूर

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक रात्री ११ वाजून ०५ मिनिटांनी शनिवार,दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजीच्या सकाळी ०९:३० वाजेपर्यंत स्थगित झाली.

**शनिवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२४**

विधानसभेची बैठक नागपूर येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ०९.३० वाजता माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. शेखर निकम यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) राजेंद्र गावित, वि.स.स. यांनी ‘पालघर जिल्ह्यातील विविध कामांसाठी होणाऱ्या भूसंपादनामुळे आदिवासी लोकांवर होत असलेला अन्याय’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री. ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके, वि.स.स. यांनी ‘ शिरूर-हवेली मतदारसंघातील मौजे वडू बुद्रूक, ता. शिरूर तसेच तुळापूर, ता. हवेली, पुणे येथे छत्रपती संभाजी महाराज यांचे ऐतिहासिक समाधी स्थळाची विकासकामे जलद गतीने पूर्ण न होणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३) श्री. सुरेश भोळे, वि.स.स. यांनी 'जळगाव शहरातील महानगरपालिकेचे प्रभारी रचनाकार श्री. दिघेश तायडे यांनी स्वतःच्या पदाचा गैरवापर करून कोट्यवधी रूपये कमविल्याच्या प्रकरणी त्यांची सीआयडी चौकशी करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४) श्री. अनंत (बाळा) नर, वि.स.स. यांनी 'जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील महाराज भवनाजवळील तिवारी चाळीतील रहिवाशी मूलभूत सेवा-सुविधांपासून वंचित असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५) श्री. सिद्धार्थ शिरोळे, वि.स.स. यांनी 'पुणे शहरामध्ये विशेषतः शिवाजीनगर मतदारसंघामध्ये कमी दाबाने व अपुरा पाणीपुरवठा होत असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(६) श्री. संजय केळकर, वि.स.स. यांनी 'ठाणे महापालिकेतील बाळकुम, ढोकाळी, कोलशेत, मानपाडा येथील मालमत्ता पत्रक बनविताना मोठ्या प्रमाणात चुकीच्या नोंदी करण्यात येणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(७) डॉ. अतुलबाबा भोसले, वि.स.स. यांनी, 'कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील कराड शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करणे तसेच कराड येथील स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळाचा पुनर्विकास करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(८) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे, वि.स.स. यांनी,'कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील कराड शहरातील वाहतूक कोंडीची समस्या दूर करणे तसेच कराड येथील स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळाचा पुनर्विकास करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(९) श्री. गजानन लवटे, वि.स.स. यांनी, 'अंजनगाव सुर्जी मतदारसंघात सर्व सोयीसुविधांनी सुसज्ज क्रीडासंकुल उभारण्याकरिता सरकारने कार्यवाही करणे तसेच सदरहू मतदारसंघातील हॉटेल वृंदावन ते सहकारी साखर कारखान्यादरम्यान बाह्य वळण रस्ता तयार करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१०) श्री. सत्यजीत देशमुख, वि.स.स. यांनी, 'सांगली जिल्ह्यातील बसरगी येथे ४ मेगावॅट सौर ऊर्जा संकलित करण्याच्या प्रकल्पास मान्यता देणे तसेच कोल्हापूर येथील पोलीस महानिरीक्षकांचे कार्यालय पुणे येथे स्थलांतरित न करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(११) श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी, 'मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांच्या दुरवस्थेची गंभीर दखल घेण्याची आवश्यकता' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१२) श्री. राजेश पवार वि.स.स. यांनी, 'नांदेड ऊर्जा विभागाने तेथील रब्बी पिके घेणाऱ्या स्थानिक शेतकऱ्यांना वीज पुरवठ्यासाठी बंद पडलेला टान्सफॉर्मर उशिरात उशिरा ४८ तासात देण्याची व्यवस्था करणे तसेच नायगाव विधानसभा मतदारसंघातील विजेच्या ३० ते ४० वर्षे जुन्या व खराब वाहिन्या RDCS योजनेंतर्गत बदलून देणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१३) श्री. राजेश विटेकर, वि.स.स. यांनी, 'परभणी येथील कृषी येथील विद्यापीठाची निष्प्रभ कामगिरी तसेच परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविमा नुकसान भरपाईपोटी २५ टक्के अग्रिम रकमेचे वाटप करण्याची गरज असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१४) श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांनी, 'विदर्भ, मराठवाड्यातील दुग्धविकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात समावेश असलेल्या १९ जिल्ह्यांकरिता चालू वित्तीय वर्षात शासनाने अधिकाधिक निधी उपलब्ध करून देणे तसेच नांदगाव-खंडेश्वर तालुक्यातील पाफळ येथील स्व. पंजाबराव देशमुख यांच्या गावामध्ये शासकीय कृषी विद्यापीठ स्थापन करणे तसेच बेलोरा विमानतळाला स्व.पंजाबराव देशमुख यांचे नाव देणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१५) श्री. रोहित आर.आर. आबा पाटील, वि.स.स. यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नियमांनुसार दोन पथकरामध्ये साधारणतः ६० किलोमीटर इतके अंतर असणे बंधनकारक असल्यामुळे देखील सांगोला तालुक्यातील अनकढाळ पथकरापासून कवठेमहांकाळ तालुक्यातील बोरगाव पर्यंत आकारला जाणारा ५२ किलोमाटरचा पथकर राज्य शासनाने बंद करणे.

(१६) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स. यांनी, 'चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत लिपिक व शिपाई पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू असून ती पारदर्शी पद्धतीने करण्याची गरज असणे तसेच चंद्रपूर मेडिकल कॉलेजमधील साहित्य घेण्यास शासनाने तत्काळ निधीची तरतूद करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१७) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स. यांनी, 'नाशिक जिल्ह्यातील आंबड पोलीस स्टेशनचे विभाजन करून चिंचाळा येथे नव्याने पोलीस स्टेशन निर्माण करण्याची आवश्यकता ' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१८) श्री. गोपीचंद पडळकर, वि.स.स.यांनी, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त मुंबई येथील मंत्रालयाच्या प्रवेशद्वाराच्या पॅसेजमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे तैलचित्र लावणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(१९) श्री. वरूण सरदेसाई, वि.स.स.यांनी, 'वांद्रे पूर्व विधानसभा क्षेत्रातील खार, तीन बंगला परिसरातील १०५० झोपड्यांचे १५ वर्षांपासून रखडलेले पुनर्वसन पूर्ण करून त्यांना हक्काची पक्की घरे देणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२०) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.यांनी, ‘शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील शेवगाव आगारासाठी २० व पाथर्डी आगारासाठी २० नवीन एसटी बसेस शासनाने लवकरात लवकर उपलब्ध करून देणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२१) श्री. जितेश अंतापूरकर, वि.स.स.यांनी, ‘नांदेड जिल्ह्यातील देगलूर बिलोरी येथील जलजीवन मिशनअंतर्गत कामे प्रलंबित ठेवणारे संबंधित विभाग व कंत्राटदार यांच्यावर कारवाई करणे तसेच छत्रपती संभाजी नगर, जालना, नांदेड, देगलूर येथील प्रस्तावित प्रादेशिक लॉजिस्टिक हब उभारण्याचे काम पूर्ण करणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२२) श्री. हेमंत ओगले, वि.स.स.यांनी, ‘माजी विधानसभा सदस्य श्री. भाऊसाहेब कांबळे यांच्या वाहनावर दिनांक २० ऑक्टोबर, २०२४ रोजी मध्यरात्री १.०० वाजता माथापूर, ता. श्रीरामपूर येथे अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केल्याच्या प्रकरणातील एकाही आरोपीस अटक न होणे तसेच राज्यातील आधार केंद्रचालकांवर सध्या बेरोजगारीचे संकट ओढवलेले असणे तसेच महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब सेवा पूर्व परीक्षा ऑक्टोबर, २०२३ मध्ये पार पडल्यानंतरही त्यातील यशस्वी उमेदवारांची सर्वसाधारण अंतिम निवड यादी अद्याप जाहीर न होणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२३) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.यांनी, ‘गेल्या -४ महिन्यांपासून दहिसर विधानसभा मतदारसंघातील म्हात्रे वाडी, जयवंत सावंत रोड, म्हाडा कॉलनी किंवा आर सेंट्रल वॉर्ड मधील पै नगर, गांजावाला अपार्टमेंट, एकसर या सर्व ठिकाणी पाणी कपात सुरु असणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२४) श्री. विजयसिंह पंडित, वि.स.स.यांनी, ‘ राज्यातील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील सुमारे ४५०० तरूणांना तांत्रिक व प्रशासकीय अडचणींमुळे विद्यावेतन वेळेवर न मिळणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२५) श्री. शंकर जगताप, वि.स.स.यांनी, ‘पुण्यातील चिचंवड मतदारसंघातील निळेपूर येथील दाट वस्तीतील पूररेषा बाधित अधिकृत असलेल्या जुन्या व जीर्ण इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा करण्यासाठी संबंधित प्रस्तावास मंजुरी देणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२६) श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स. यांनी, ‘अहिल्यानगर जिल्ह्यातील कुकडी मतदारसंघातील पारनेर, श्रीगोंदा, जामखेड व करमाळा या भागातील पाण्याची कमतरता भागविण्यासाठी डिंबे ते माणिकडोह बोगदा कॅनल तयार करण्याच्या कामास प्राधान्य देणे’ इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२७) श्री. सुहास बाब, वि.स.स. यांनी, 'खानापूर मतदारसंघातील आटपाडी तालुक्यात ब्रिटीश कालीन तलाव असून पुजारवाडी गावच्या हद्दीतील ओढ्यावरील जलसेतूचे काम २ वर्षांपासून रखडलेले असणे तसेच आटपाडी तालुक्यातील शेडगेवाडी नावाचे गाव नगरपंचायतीमधून वगळले असून सदर गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत मंजूर करणे तसेच खानापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाचे उप केंद्र उभारण्याचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२८) श्री. संजय पुराम, वि.स.स. यांनी, 'राज्यात एमपीएससी मार्फत महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट 'ब' सेवा पूर्व परीक्षा २०२२ या परीक्षेची जाहिरात दिनांक २३ जून २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर पूर्व परीक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची मुख्य परीक्षा तब्बल १ वर्ष उशिरा म्हणजे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये पार पडलेली असतानासुद्धा उत्तीर्ण उमेदवारांची सर्वसाधारण निवड यादी दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी जाहीर केली असूनही पुढील १५ दिवसात एमपीएससीकडून अंतिम निकाल जाहीर न करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२९) श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांनी, ' यवतमाळमधील उमरेड मतदारसंघातील अखर्चित अथवा समर्पित आमदार स्थानिक विकास निधी भिवापूर येथील पाणीटंचाई दूर करण्यासाठी तसेच आवश्यक त्या बाबींची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध करून देणे तसेच नागपूर शहरात बंजारा समाज सभागृह उभारणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३०) श्री. बाबुराव कदम-कोहळीवर, वि.स.स. यांनी, 'नांदेडमधील हदगाव व हिमायतनगर येथे कमी दाबाने होणाऱ्या वीज पुरवठ्याच्या समस्येकरिता उपाय म्हणून शासनाने ५० नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून देणे तसेच शेतात काम करताना सर्पदंशाने मरण पावलेल्या शेतकऱ्यास व शेतमजुरास नैसर्गिक आपत्तीचे तत्त्व लावून चार लाखांची आर्थिक मदत करणे तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस जळाल्यास शासनाने २० टक्के कपात न करता त्यांना मदत करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३१) श्री. राघवेंद्र पाटील, वि.स.स. यांनी 'राज्यातील शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी कृषी विभागांतर्गत सुरु करण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प म्हणजेच 'पोकरा' योजनेत कायमच शोषित व पीडित राहिलेल्या धुळे ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचा समावेश करणे तसेच अक्कलपाडा धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याच्या अस्तरीकरणाराचा प्रस्ताव शासनाने मंजूर करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३२) श्रीमती सुलभा गायकवाड, वि.स.स. यांनी 'कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघातील तीसगाव नाका ते सिद्धार्थ नगर ते काटेमानवली नाका या प्रचंड रहदारीच्या रस्त्याच्या रूंदीकरणामधील बाधितांचे पुनर्वसन करणे तसेच कल्याण पूर्व विधानसभा मतदारसंघातील पाणीपुरवठा समस्या, जलकुंभ , क्रीडासंकुल याकरिता भरीव निधीची तरतूद करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३३) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स. यांनी 'नवी मुंबई शहरातील वेगवान विकासकामे व वाढती लोकसंख्या लक्षात घेता महानगरपालिकेने अतिरिक्त पर्यायी पाण्याचे स्त्रोत निर्माण करणे तसेच टाटा पॉवर मिरा हायड्रो प्रकल्पाचे पाणी मोरबे धरणामध्ये पाईपलाईनव्दारे आणण्याची आवश्यकता' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३४) श्री. सुरेश धस, वि.स.स. यांनी, बीड जिल्ह्यातील जिजाऊ मल्टीस्टेट, ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, मातोश्री राजधानी मल्टीस्टेट, मराठवाडा अर्बन, माजलगाव या मल्टीस्टेट को ऑपरेटीव्ह बँकांनी जवळपास ५ हजार ५०० कोटी रूपयांच्या ठेवी बुडविल्यामुळे बीडमधील २६ ठेवीदारांचा मृत्यू होणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३५) श्री. बालाजी कल्याणकर, वि.स.स. यांनी, 'नांदेड उत्तर मतदारसंघातील सिंचनाच्या प्रश्नाकरिता अधिकाधिक निधी उपलब्ध करून देणे तसेच नांदेड शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याकरिता राज कॉर्नर ते वजिराबाद चौकापर्यंत मोठा उड्डाणपूल तयार करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३६) श्री. काशिनाथ दाते, वि.स.स.यांनी, 'मौजे पळशी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथील शासकीय आश्रमशाळेत ग्रामीण भागातील मागासलेल्या आदिवासी मुलामुलींसाठीच्या निवासी आश्रमतशाळेत चांगल्या सोयी-सुविधांचा अभाव असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३७) श्री. महेश सावंत, वि.स.स. यांनी, 'मुंबईतील माहीम मतदारसंघातील कोळी बांधवांच्या होळी या जिव्हाळ्याच्या सणाकरिता रात्री उशिरापर्यंत लाऊडस्पीकर सुरु ठेवण्याची परवानगी देणे तसेच माजी सन्माननीय सदस्य श्री. सदाभाऊ सरवणकर यांनी आपल्यावर दोन वर्षांपूर्वी बंदुकीव्दारे गोळीबार करूनही त्यांच्यावर आजपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात न येणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३८) डॉ. बाबासाहेब देशमुख, वि.स.स यांनी, 'राज्यात एप्रिल, २०२४ पासून ७ हिंद केसरी व २० महाराष्ट्र केसरी यांचे मानधन शासनाने दिलेले नसणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३९) श्री. अभिमन्यू पवार, वि.स.स यांनी, 'लातूर जल्ह्यातील भूकंपग्रस्त औसा व उमरगा विधानसभा मतदारसंघांतील गावांसाठी कोयना भूकंपाच्या धर्तीवर मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीत समावेश होणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४०) श्री. सुमित वानखेडे, वि.स.स यांनी, 'वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील शेवगाव व लवणे येथील दिनांक २१ जुलै, २०२४ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई पासून वंचित ठेवणाऱ्या अधिका-यांवर कारवाई करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४१) श्री. हिरामण खोसकर, वि.स.स यांनी, 'वैतरणा धरणातील पाणी मुकना धरणामध्ये सोडून मराठवाड्याला १ टीएमसी पाणी देण्याच्या बदल्यात शेतकऱ्यांना १५५० एकर जागा परत देण्याच्या बाबतीत माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी मध्यस्ती करून निर्देश देणे तसेच कळमुसे धरणाच्या वळण योजनेचे काम सुरु करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४२) श्री. रामदास मसराम, वि.स.स यांनी, 'राज्यातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी नोकरीत घेणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४३) श्री. बाबाजी काळे, वि.स.स यांनी, 'एसईबी प्रवर्गातील नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणाऱ्या मुलांसाठी फी माफीचा शासन निर्णय नव्याने निर्गमित करणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४४) श्रीमती सना मलिक, वि.स.स. यांनी, ' मुंबईतील एम पूर्व विभागातील व्हिडिओकॉन व एसजी केमिकल वसाहतीमधील सुमारे १५ इमारतींचे विजेचे कनेक्शन दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ पासून महानगरपालिकेच्या भोंगळ कारभारामुळे अदानी कंपनीकडून कापण्यात आलेले असणे' इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ५५ मिनिटांनी
सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक माननीय अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर
यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वाजता सुरु झाली.

(१) अजित पवार (उपमुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले :—

(क) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(ख) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा एकोणिसावा वार्षिक अहवाल,

(ग) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(घ) डॉ. होमी भाभा स्टेट युनिर्व्हसिटी, मुंबई यांचा सन २०१९-२०२० ते सन २००२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल

(ङ) कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय यांचा सन २०२१- २०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(च) कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय यांचा सन २०२१- २०२२ व सन २०२३-२०२४ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(छ) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा चौतिसावा वार्षिक अहवाल,

(ज) शुल्क नियामक प्राधिकरण यांचा सन २०१७-२०१८ ते २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक अहवाल व लेखा परीक्षण अहवाल,

(झ) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा आणि स्वतंत्र लेखा परीक्षण अहवाल

(त्र) महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल,

(ट) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण बृहन्मुंबई यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल

(२) श्री. अजित पवार (उपमुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता), यांनी महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम-६ (१) नुसार सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पासंदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(३) श्री. अजित पवार (उपमुख्यमंत्री) यांनी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे

(१) सन २०२३-२०२४ या वर्षाचा विनियोजन लेखा अहवाल आणि

(२) सन २०२३-२०२४ या वर्षाचा वित्तीय लेखा अहवाल खंड-एक व खंड-दोन तसेच

(३) महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधा आणि आरोग्य सेवांचे व्यवस्थापन यावरील संपादणूक लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

आज प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**पुरःस्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे—**

(१) श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (मंत्री, माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी, सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक ३६—महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४ यांनी सभागृहाच्या अनुमतीने विधेयक मांडले व भाषण केले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**३. अंतिम आठवडा प्रस्ताव-(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

सर्वश्री भास्कर जाधव व इतर वि.स.स. यांनी “आदिवासी माता व बालकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढणे, शासकीय रूग्णालयांमध्ये पुरेसे कर्मचारी नसणे, वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांना घरे खाली करण्याची नोटीस देण्यात येणे, राज्यात अमली पदार्थांची सर्रासपणे होणारी विक्री, शेतकऱ्यांच्या पिकांना हमीभावापेक्षा कमी किमतीत शेतमाल विकावा लागणे” इ. बाबत म.वि.स. नियम २९३ अन्वये दिलेला अंतिम आठवडा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. भास्कर जाधव

(चर्चा अपूर्ण)

श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे, वि.स.स. यांनी,’ मतदारसंघात काही महिन्यांपूर्वी श्रीयोग एक्सपोर्ट कंपनी सुरु करणारा योगेश उत्तमराव पांचाळ हा तरुण व्यवसायानिमित्त इराणमध्ये गेल्यानंतर

त्याचे वास्तव्य असलेल्या तेहराण, बहारीस्तानच्या हेरिटेज हॉटेलमधून बेपत्ता होणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी, असे निदेश माननीय तालिका सभाध्यक्षांनी दिले.

**अंतिम आठवडा प्रस्ताव-(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला-

(२) श्री. सुरेश धस

(चर्चा अपूर्ण)

श्री. कैलास घाडगे-पाटील, वि.स.स. यांनी, 'धाराशिव जिल्ह्यामध्ये दोन महिन्यांपासून बिबट्याचा वावर असल्यामुळे जिल्ह्यातील नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे तसेच शेतीला पाणी देण्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांनी, 'सभागृहातील कामकाजाच्या दरम्यान एखाद्या मंत्र्याची प्रतिमा डागाळली जाईल असे वक्तव्य व नामोल्लेख न करणे' इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

**अंतिम आठवडा प्रस्ताव-(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला-

(३) श्री. रमेश बोरनारे (४) श्री. शंकर मांडेकर

(५) श्री. विकास ठाकरे (६) श्री. जितेंद्र आव्हाड

(७) श्री. अबू आझमी

(चर्चा अपूर्ण)

**शासकीय विधेयक-(पुढे सुरू)-**

**सन २०२४ चे वि.स.वि.क्रमांक ३३**—विशेष जन सुरक्षा विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधानपरिषदेने सहमती दिल्याबद्दलचा संदेश व विधेयक संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव.

माननीय तालिका सभाध्यक्षांनी, विधानपरिषदेकडून पुढील संदेश आलेला असून सचिव तो संदेश वाचून दाखवतील, असे सांगितले.

**संदेश**

सह सचिव (श्रीमती मेघना तळेकर) यांनी पुढील संदेश वाचून दाखविला—

"कळविण्यात येत आहे की, सन २०२४ चे वि.स.वि. क्रमांक-३३—व्यक्ती आणि संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना अधिक प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक, विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, या विधानसभेच्या प्रस्तावास विधानपरिषदेने आपल्या दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजीच्या सभेत सहमती दिलेली आहे. आणखी असेही कळविण्यात येत आहे की, दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजीच्या सभेत या संयुक्त समितीवर विधानपरिषदेचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट केले आहेत :—

(१) श्रीमती उमा खापरे, वि.प.स.

(२) श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.

(३) श्री.अमित गोरखे, वि.प.स.

(४) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

(५) श्रीमती मनिषा कायंदे, वि.प.स.

(६) श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.

(७) श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.

विशेष निमंत्रित : ८) श्री.अंबादास दानवे, मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद

मुख्यमंत्र्यांनी, उपरोक्त विधेयक दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन, विचारार्थ पाठविण्यात यावे आणि या संयुक्त समितीवर श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांची समिती प्रमुख म्हणून तर पुढील विधानसभा सदस्यांचे सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडलाः-

(१) श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मा. मंत्री

(२) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(३) श्री. सिध्दार्थ शिरोळे, वि.स.स.

(४) श्री. राजेश पाडवी, वि.स.स.

(५) श्रीमती मनीषा चौधरी, वि.स.स

(६) श्री. तुषार राठोड, वि.स.स.

(७) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(८) श्री. मनोज कायंदे, वि.स.स.

(९) श्री. दीपक केसरकर, वि.स.स.

(१०) श्री. रमेश बोरनारे, वि.स.स.

(११) श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स.

(१२) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(१३) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१४) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**अंतिम आठवडा प्रस्ताव-(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला-

(८) श्री. नितीन देशमुख

(चर्चा अपूर्ण)

श्री. देवराव भोंगळे, वि.स.स. यांनी, 'चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बॅंकेमधील पदभरती प्रक्रियेसंदर्भातील परीक्षा शासनाने रद्द करून या प्रकरणाची सखोल तपासणी करणे व नव्याने परीक्षा घेणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**अंतिम आठवडा प्रस्ताव-(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला-

(९) श्री. देवराव भोंगळे

(चर्चा अपूर्ण)

डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांनी, 'नागपूर शहरातील बुटीबोरी एमआयडीसीत पेट्रोल पंप चालविणाऱ्या आदिवासी समाजाच्या एका महिलेचा परप्रांतीय तरूण व त्याच्या साथीदारांनी विनयभंग करणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**अंतिम आठवडा प्रस्ताव-(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला—

(९) श्री. आनंद तिडके

(चर्चा अपूर्ण)

**माहितीचा मुद्दा-**

श्री. अबू आझमी, वि.स.स. (प्रतिवेदन शाखेतील हिंदी प्रतिवेदकांची सर्व पदे रिक्त असल्याने हिंदी प्रतिवेदन उपलब्ध नाही.)

**म.वि.स. नियम २९३ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव-(चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु झाली.

चर्चेत खालील सदस्यांनी भाग घेतला—

(१०) श्री. राजकुमार बडोले

(११) डॉ. नितीन राऊत

(१२) श्री. सुनिल प्रभू

(१३) श्री. विक्रम पाचपुते

(१४) श्री. चंद्रकांत ऊर्फ राजूभैय्या नवघरे

(१५) श्री. संजय मेश्राम

(१६) श्री. जयंत पाटील

मुख्यमंत्र्यांनी, उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेस उत्तर दिले.

सभागृहाने उपरोक्त प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय अध्यक्षांनी सांगितले.

**सत्रकालीन कामकाजाचा संक्षिप्त आढावा—**

माननीय अध्यक्षांनी, सोमवार, दिनांक १६ डिसेंबर,२०२४ ते शनिवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२४ या कालावधीत सभागृहात झालेल्या कामकाजासंबंधीचा आढावा सभागृहात वाचून दाखवला.

**पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा—**

महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक ०३ मार्च, २०२५ पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस माननीय राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे, असे माननीय अध्यक्षांनी घोषित केले.

**सत्र समाप्तीसंबंधी घोषणा—**

माननीय अध्यक्षांनी, सत्र-समाप्तीसंबंधीचा माननीय राज्यपालांचा पुढील आदेश सभागृहात वाचून दाखविला-

"भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२), उप खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी सी.पी. राधाकृष्णन, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधानसभेचे सत्र संस्थगित करीत आहे."

**यानंतर राष्ट्रगीताचे गायन झाले.**

**विधानसभेचे सत्र सायंकाळी ०४ वाजून ४२ मिनिटांनी संस्थगित झाले.**

*****

# विवरण क्रमांक

## मत विभाजन

| दिनांक व प्रभारी सदस्य | प्रस्ताव/सुधारणा | प्रस्तावाला/सुधारणेला अनुकूल मत | प्रस्तावाला/सुधारणेला प्रतिकूल मत | तटस्थ | प्रस्ताव/सुधारणा संमत की असंमत |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| - | - | निरंक | - | - | - |

*****

# विवरण क्रमांक - ८

महाराष्ट्र विधानसभेच्या नियम ८ (१) अन्वये, मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर, २०२४ व बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी नामनिर्देशित केलेली अनुक्रमे चार आणि एक सभाध्यक्षांची तालिका :—

(१) श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(२) श्री. रमेश बोरनारे, वि.स.स.

(३) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(४) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(५) श्री. चैनसुख संचेती, वि.स.स.

***

# विवरण क्रमांक -९

## विविध समित्यांवर/संस्थांवर/मंडळांवर/विद्यापीठांवर सदस्यांची निवडणूक व नामनियुक्ती

**निरंक**

***

# विवरण क्रमांक - १०

## विविध समित्यांच्या बैठकी

| अ.क्र. | समितीचे नाव | बैठकीचा वार व दिनांक | बैठकीत झालेले कामकाज |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | कामकाज सल्लागार समिती | सोमवार, दि. ९ डिसेंबर, २०२४ | विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक सोमवार, दि. ९ डिसेंबर, २०२४ रोजी विधानसभा सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर कक्ष क्रमांक ०४३, तळमजला, विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने २०२४ च्या पाचवे (हिवाळी) अधिवेशनासंबंधात संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनदर्शिकेवर विचारविनिमय करून पुढील निर्णय घेतले :-<br>**:: निर्णय ::**<br>(१) नागपूर येथे होणाऱ्या सन २०२४ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनातील सोमवार, दिनांक १६ डिसेंबर ते शनिवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२४ या कालावधीतील कामकाज निश्चित करण्यात आले.<br>(२) प्रस्तुत अधिवेशनात तारांकित प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना, अशासकीय कामकाज, अर्धा-तास चर्चा या संसदीय आयुधांमार्फत होणारे कामकाज घेण्यात येणार नाही. तथापि, औचित्याचे मुद्दे दररोज एक तास घेण्यात येतील.<br>(३) विधानसभा कामकाज सल्लागार समितीची पुढील बैठक बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी विधानभवन, नागपूर येथे घेण्याचे निश्चित करण्यात आले.<br>*** |

| अ.क्र. | समितीचे नाव | बैठकीचा वार व दिनांक | बैठकीत झालेले कामकाज |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (२) | कामकाज सल्लागार समिती | बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२४ | **मा. मंत्री :** महोदय, विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक आज बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी दुपारी ०२.३० वाजता कक्ष क्रमांक ०७ (मंत्री परिषद सभागृह), पहिला मजला, मुख्य इमारत, विधान भवन, नागपूर येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने सभागृहापुढील उर्वरीत कामकाजाचा आढावा घेवून गुरूवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२४ ते शनिवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२४ पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे अशी शिफारस करण्याचा निर्णय घेतला आहे. |
| | | | **डिसेंबर, २०२४**<br>गुरुवार, दिनांक १९ — (१) सन २०२४-२०२५ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस)<br>(२) शासकीय कामकाज<br>(३) विरोधी पक्षाचा प्रस्ताव (अंतिम आठवडा प्रस्ताव)<br>शुक्रवार, दिनांक २० — (१) सन २०२४-२०२५ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस) (चर्चारोध)<br>(२) पुरवणी विनियोजन विधेयक<br>(३) शासकीय कामकाज<br>शनिवार, दिनांक २१ — शासकीय कामकाज |

***

# विवरण क्रमांक ११

## शासकीय विधेयकासंबंधी सांख्यिकीय माहिती सन २०२४ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशन

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे विधेयक, २०२४ | ग्राम-विकास | मुख्य-मंत्री | १६/१२/२०२४ | १६/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १७/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२५ चा १ | |
| २ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२४ | नगर-विकास | मुख्य-मंत्री | १६/१२/२०२४ | १६/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १७/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२५ चा २ | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) विधेयक, २०२४ | विधि व न्याय | मुख्य-मंत्री | १६/१२/२०२४ | १६/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १७/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२५ चा ३ | |
| ४ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) विधेयक, २०२४ | महसूल व वन | मुख्य-मंत्री | १६/१२/२०२४ | १६/१२/२०२४ | -- | --- | --- | --- | --- | --- | -- | विधेयक विचारात घेण्यात यावे या प्रस्तावावरील चर्चा दि. १७/१२/२०२४ रोजी स्थगित ठेवण्यात आली. |
| ५ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२४ | सामान्य प्रशासन | मुख्य-मंत्री | १६/१२/२०२४ | १६/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १७/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२५ चा ४ | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ | महसूल व वन | मुख्य-मंत्री | १६/१२/२०२४ | १६/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १७/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२५ चा ५ | |
| ७ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२४ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य | मुख्य-मंत्री | १६/१२/२०२४ | १६/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १७/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२५ चा ६ | |
| ८ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ - हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०२४ | महसूल व वन | मुख्य-मंत्री | १६/१२/२०२४ | १६/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १७/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२५ चा ७ | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२४ | वित्त | मुख्य-मंत्री | १७/१२/२०२४ | १७/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १८/१२/२०२४ | १९/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२५ चा ३० | |
| १० | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२४ | महसूल व वन | मुख्य मंत्री | १७/१२/२०२४ | १७/१२/२०२४ | -- | १८/१२/२०२४ | २०/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२५ चा ९ | |
| ११ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा व विधीग्राह्यीकरण) विधेयक, २०२४ | वित्त | मुख्य मंत्री | १८/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | १९/१२/२०२४ | २०/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२५ चा १० | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा विधेयक, २०२४ | गृह | मुख्य मंत्री | १८/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | --- | दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजी दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात-बाबतचा मा. मुख्यमंत्री यांचा प्रस्ताव संमत झाला. | दिनांक २० डिसेंबर, २०२४ रोजी विधानपरिषदेने संमती दिली व दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजी विधानपरिषदेने सदस्य नामनिर्दिष्ट केले. | --- | --- | --- | --- | दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले. |
| १३ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२४ | गृह | मुख्य मंत्री | १८/१२/२०२४ | १८/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २०/१२/२०२४ | २१/१२/२०२४ | --- | --- | --- | --- | |

| अ. क्र. | विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक | विभाग | प्रभारी मंत्री | पुरःस्थापनेचा दिनांक | असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक | पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव | विधानसभेत संमत झाल्याचा दिनांक | विधानपरिषदेत संमत झाल्याचा दिनांक | दुरुस्ती सुचविणाऱ्या सदस्यांची संख्या | दुरुस्त्यांची एकूण संख्या | मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या | अधिनियम क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२४ | वित्त | मुख्य मंत्री | २०/१२/२०२४ | २०/१२/२०२४ | विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत) | २०/१२/२०२४ | २०/१२/२०२४ | --- | --- | --- | सन २०२४ चा ३६ | |
